अहवाल क्रमांक : १६५

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

धुळे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## एकोणीसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१८

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

धुळे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## एकोणीसावा अहवाल



एचबी १६०९—१

# पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

*सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी पासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

**सन्माननीय समिती प्रमुख, श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रदीप मयेकर अवर सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर , कक्ष अधिकारी

# प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा एकोणीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधान सभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेख्यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असले (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधान परिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धती मध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेलेआहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्ष विरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेश रहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात. त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी या बाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबातीत विधानमंडळाला सर्व तो परी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समिती प्रती व विधानमंडळा प्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादे पर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबी संदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षी पुरावा गोळा केला. तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धती मधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढते वेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधी प्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे या संबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धतीही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणाली मध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्य साधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हापरिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्याबाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उप केंद्रे पशुवैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन या बाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने धुळे जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने धुळे जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१७ रोजी भेट देऊन श्री. गंगाथरन, डी., मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १५ व १६ मे, २०१८ रोजी जिल्हा परिषद, धुळे संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. असिम कुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. र. प्र. आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. ता. मा. कोळेकर, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. व्ही. जी. देशमुख, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. पां. रा. खोटरे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती स्वाती नानए, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. आ. ना. मोंडवे, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. उ. मा. कावडे, उप संचालक, ग्रामविकास विभाग, डॉ. पल्लवी दराडे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, श्री. नितीन देवरे, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, श्री. संजीव कांबळे, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या धुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | जिल्हा परिषदेमध्ये डॉक्टर्स, नर्सेस व इतर पदे रिक्त असल्याबाबत | १ |
| (२) | दोन | मागासवर्गीय महिलांना १० टक्के निधीतून शिलाई मशीन वाटप न करणे तसेच महिलांच्या प्रशिक्षणासाठी ५० टक्के रक्कम खर्च न करणेबाबत (पंचायत समिती, शिंदखेडा) | ७ |
| (३) | तीन | पंचायत समिती शिंदखेडा अंतर्गत विनापरवानगीने ओ.एम.रुपनगर माध्यमिक शाळा सुरू असलेबाबत | १० |
| (४) | चार | मौजे बेटावद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने शौचालयाचे बांधकाम अपूर्ण केल्याबाबत | १४ |
| (५) | पाच | जिल्हा परिषदेचे स्वःउत्पन्न | १६ |
| (६) | सहा | जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक | १८ |
| (७) | सात | जवाहर रोजगार हमी योजनेच्या अपहार प्रकरणातील वसुलीबाबत | २० |
| (८) | आठ | शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत | २२ |
| (९) | नऊ | इंदिरा आवास योजनेबाबत | २५ |
| (१०) | दहा | एकात्मिक बालविकास योजना | २८ |

**परिशिष्ट " अ " " ब "**

**शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त**

## प्रकरण एक

### जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

### जिल्हा परिषदेमध्ये डॉक्टर्स, नर्सेस व इतर पदे रिक्त असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस भेट दिली. समितीने धुळे जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य आणि जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांशी अनौपचारिक चर्चा केली असता समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेमध्ये डॉक्टर्स, नर्सेस व इतर पदे रिक्त आहेत. पूर्वी शिक्षक, लिपिक व इतर पदे भरण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला होते, परंतु हे अधिकार काढून घेण्यात आल्यामुळे जिल्हा परिषदेची गैरसोय होत आहे अशी माहिती देण्यात आली.

समितीने अनेक जिल्ह्यांचा दौरा केला त्या दौऱ्यामध्ये सर्वच जिल्हा परिषदांमध्ये ही परिस्थिती असल्याचे दिसून आले. त्यामुळे जिल्हा परिषदेतील रिक्त पदांच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत हा विषय घेण्यात यावा तसेच हा विषय राज्य पातळीवरील असल्यामुळे त्या बैठकीस मुख्य सचिव तसेच ग्राम विकास विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग व आरोग्य विभाग या विभागांच्या सचिवांना साक्षीच्या वेळी बोलाविण्यात यावे असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

समितीने धुळे जिल्हा परिषदेला भेट दिली असता धुळे जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसदर्भात जिल्हा परिषदेमध्ये डॉक्टर्स, नर्सेस व इतर पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदांची सद्य:स्थिती काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट–अ व ब यांची प्रशासकीय बदली, विनंती बदली/पदव्युतर पदवी/पदविका प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्ती, सेवानिवृत्ती इत्यादी कारणांमुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त झालेली आहेत.

वैद्यकीय अधिकारी गट–अ व ब ही पदे शासनस्तरावरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात होती. तथापि, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक मवैअ–२०१५/प्रक्र.७३९/निमं/सेवा–३, मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २४ जून, २०१६ **(परिशिष्ट क्र. १.१)** अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ (वेतन श्रेणी रुपये १५,६००–३९,१०० ग्रेड पे रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट अ दर्जाची पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग कक्षेतून वगळून ती स्वंतत्र निवडमंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

तसेच सदर पदे भरण्याकरिता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक मवैअ–२०१५/प्र.क्र.७३९/सेवा–३, मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ **(परिशिष्ट क्र. १.२)** अन्वये मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करून वैद्यकीय अधिकारी गट–अ संवर्गाची रिक्त असलेली पदे मुलाखतीद्वारे भरण्याकरिता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्यानुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट–अ या संवर्गाने वैद्यकीय अधिकारी गट–अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक मवैअ–२०१५/प्र.क्र.७३९/सेवा–३ मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने समुपदेशनाद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्याची निवड करून प्रवर्ग निहाय आरक्षणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी गट–अ या पदावर (रुपये १५६००–३९१०० ग्रेड पे रुपये ५४००) या वेतन श्रेणीत नेमणूक देण्यात आलेली होती. सदर पदभरती माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये आयोजित करणेत येऊन एकूण ०६ याप्रमाणे एकूण १२ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शासन स्तरावरून मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडील पत्र क्र.संआसे/मवैअसे/२अ/टे–५/वै.अ.गट–अ पदभरती/ ३९४ पदे/२९५०/१७, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ अन्वये रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. अस्थायी गट व वैद्यकिय अधिकारी व गट अ चे पदावर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी हजर झाल्याने आज रोजीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. (१) | संवर्गाचे नाव (२) | मंजूर पदे (३) | भरलेली पदे (४) | रिक्त पदे (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १) | जिल्हा आरोग्य अधिकारी (गट-अ वर्ग-१) | ०१ | ० | ०१ | |
| २) | अति.जिल्हा आरोग्य अधिकारी (गट-अ वर्ग) | ०१ | ०१ | ० | |
| ३) | सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी (गट-अ वर्ग) | ०१ | ० | ०१ | |
| ४) | जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी (गट-अ वर्ग-१) | ०१ | ० | ०१ | |
| ५) | जिल्हा प्रशिक्षण पथक वैद्य. अधि. (गट-अ वर्ग-२) | ०१ | १ | ० | |
| ६) | तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ वर्ग-२) | ०४ | ०३ | ०१ | |
| ७) | वैद्यकीय अधिकारी (गट-अ वर्ग-२) | ६८ | ६१ | ०० | वैद्यकीय अधिकारी गट-अ चे जागी एकूण ०७ गट-ब अस्थाई वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. |
| ८) | वैदयकीय अधिकारी (गट-ब वर्ग-३) | २८ | ३५ | ० | |
| | एकूण | १०५ | १०१ | ०४ | |

जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत वैद्यकीय अधिकारी, गट-अ व ब चे रिक्त पदांचा कार्यभार इतर वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपवून कामकाज सुरू आहे.

२) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धुळे येथील मुख्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची संवर्ग निहाय गट-क पदांची मंजूर, भरलेले व रिक्त पदांची दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजीची सद्य:स्थितीची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र (१) | संवर्गाचे नांव (२) | मंजूर पदे (३) | भरलेली पदे (४) | रिक्त पदे (५) |
|---|---|---|---|---|
| १ | आयु.वि.अ | १ | १ | ० |
| २ | सांखिकी पर्यवेक्षक | १ | १ | ० |
| ३ | जिल्हा साआ.परि. | १ | १ | ० |
| ४ | सांखेकी अन्वेषक | १ | ० | १ |
| ५ | वि.अ.आरोग्य | ४ | ३ | १ |
| ६ | औ.नि.अ. | १ | १ | ० |
| ७ | आ.सहायक | ४ | ४ | ० |
| ८ | आ.सेवक | ३ | २ | १ |
| ९ | शित साखळी तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| १० | चित्रकार/छायाचित्रकार | १ | ० | १ |
| ११ | प्रक्षेपक | १ | ० | १ |
| १२ | जिल्हा समन्वयक | १ | ० | १ |
| १३ | जिल्हा स्त्री क्षेत्र कार्यकर्ती | १ | ० | १ |
| | एकूण | २१ | १३ | ०८ |

३) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कार्यरत वर्ग-३ तांत्रिक संवर्गाची गट-क व गट-ड संवर्गातील सर्व कर्मचारी यांची मंजुर, भरलेली व रिक्त पदांची सद्यःस्थिती खालील प्रमाणे :-

| अ.क्र (१) | संवर्गाचे नांव (२) | मंजुर पद (३) | भरलेली पदे (४) | रिक्त पदे (५) |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | ०७ | ०६ | ०१ |
| २ | आरोग्य सहाय्यक (पु) | ५९ | ५६ | ०३ |
| ३ | आरोग्य सहाय्यक (स्त्री) | ४१ | ३४ | ०७ |
| ४ | आरोग्य सेवक (पु) | २२७ | १२८ | ९९ |
| ५ | आरोग्य सेवक (स्त्री) | ३९५ | २३५ | १६० |
| ६ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | १८ | १४ | ०४ |
| ७ | औषध निर्माता | ४२ | ४२ | ०० |
| ८ | स्विपर | ४१ | २६ | १५ |
| | **एकूण** | **८३०** | **५४१** | **२८९** |

तसेच वरील तांत्रिक संवर्गाची पदनिहाय रिक्त पदांची स्थिती असून शासनाच्या आदेशान्वये जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत तांत्रिक संवर्गाची गट-क व गट-ड संवर्गातील सर्व रिक्त पदे वेळोवेळी भरणेबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

धुळे जिल्हा परिषदेस सन २०१७-१८ च्या संचमान्यतेनुसार प्राथमिक शिक्षकांची एकूण ३६७० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १०६ पदे रिक्त आहेत. आंतर जिल्हा बदलीने ७६ प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्याबाहेर जात आहेत, तसेच १६४ प्राथमिक शिक्षक अन्य जिल्ह्यातून धुळे जिल्ह्यात येत आहेत. त्यामुळे रिक्त पदांचे प्रमाण अत्यल्प (१८) आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** शिक्षकांची रिक्त पदे अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे "पवित्र" संगणकीय प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती समितीने धुळे जिल्हा परिषदेच्या दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या मुद्यांवर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. रिक्त पदांसंदर्भात अनौपचारिक चर्चेमध्ये मुद्दा उपस्थित झाला होता की, धुळे जिल्हा परिषदेमध्ये वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ व वर्ग ४ ची आरोग्य व शालेय शिक्षण विभागातील बरीच पदे रिक्त होती. या विषयामध्ये शासनाचा अभिप्राय व्यक्त केलेला नसल्यामुळे तो अभिप्राय का देण्यात आला नाही अशी समितीने विचारणा केली असता प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग असे मिळून पूर्ण १०५ पदे धुळे जिल्हापरिषदेला मंजूर आहेत, यापैकी १०१ पदे भरलेली आहेत आणि फक्त ४ पदे सध्या रिक्त आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही पूर्ण पदे भरलेली आहेत काय, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ६८ पदे मंजूर आहेत आणि त्यापैकी ६१ पदे आज भरलेली आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-ब ची ५८ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३५ पदे भरलेली आहेत आणि त्यातील ७ पदे अस्थायी म्हणून कार्यरत आहेत. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी हे पद भरलेले आहे. यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, आर.सी.एस. आणि तालुका आरोग्य अधिकारी ह्या चार पदांपैकी तीन पदे भरलेली असून एक पद रिक्त आहे. सर्वकालिक ज्या बदल्या होणार आहेत त्यामध्ये पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, जी अस्थायी पदे आहेत त्यामध्ये अस्थायी म्हणजे नेमके काय आहे, एन.आर.एच.एम. किंवा होमिओपॅथी, आयुर्वेदिक ही पदे धरून ६८ पैकी ६१ पदे ही एम.बी.बी.एस.ची पदे आहेत काय, त्या जिल्ह्यामध्ये एकूण प्राथमिक आरोग्य केंद्रे किती आहेत आणि एका आरोग्य केंद्रासाठी एम.बी.बी.एस.चे किती डॉक्टर अनुज्ञेय आहेत काय,

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विदित केले की, ही ६८ पदे वैद्यकीय अधिकारी गट-अ ची आहेत आणि तिथे कार्यरत असणारे ६१ डॉक्टर हे सर्व एम.बी.बी.एस. आहेत. ३५ पदे ही वैद्यकीय अधिकारी गट-ब ची असून सर्व बी.ए.एम.एस. डॉक्टर आहेत. पी.एच.सी.च्या पदांचा आराखडा आहे त्यामध्ये एक पी.एच.सी. साठी १५ पदे मंजूर असतात, त्यापैकी १ एम.बी.बी.एस. व १ बी.ए.एम.एस डॉक्टर असतील. तसेच धुळे जिल्ह्यामध्ये ४१ आरोग्य केंद्र असून जिल्ह्यामध्ये समाधानकारक परिस्थिती दिसून येते. मोठया प्रमाणावर डॉक्टर्स मिळण्यासाठी थेट मुलाखती घेण्याची मूभा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेली आहे आणि ते एम.बी.बी.एस. डॉक्टरला नियुक्त करु शकतात. तसेच डिसेंबर महिन्यात एक मोहीम राबवली होती आणि जवळपास ३०० डॉक्टर्स भरती केले आहेत. काही डॉक्टर हे पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण होऊन रुजू झाले आहेत म्हणून या जिल्ह्याची परिस्थिती चांगली आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, या वैद्यकीय अधिकाऱ्यांची १२७१ रिक्त पदे भरण्याची जाहिरात काढली होती. त्याची राज्यामध्ये पूर्णपणे भरती झाली आहे काय, वित्त विभाग पदे भरण्यासाठी परवानगी देत नाही. मग वित्त विभागाने तो शासन निर्णय रद्द केला आणि ती रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी दिली असे सांगण्यात आले असल्याने त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे, याबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, राज्यामध्ये गट-अ वैद्यकीय अधिकारी यांची ७७८९ एवढी पदे मंजूर आहेत, यापैकी ६१५० एवढी पदे भरलेली आहेत. आपण ज्या जाहिरातीबद्दल विचारले तर ती जाहिरात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात काढली होती. दिनांक ४ व ५ डिसेंबर रोजी आपण त्याची कॉन्सिलिंग घेतली आणि त्यामध्ये ३२४ किंवा ३२८ हा डॉक्टरर्सचा आकडा असून ३३९ डॉक्टर्सला नियुक्ती आदेश निर्गमित केले आहेत अशी माहिती दिली असता ६१५० ही भरलेली पदे आहेत तर याचे जिल्हानिहाय वर्गवारी देण्यात यावी अशी मागणी केली असता आता ती सध्या उपलब्ध नसून समितीस नंतर देण्यात येईल.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सार्वजनिक आरोग्य विभाग सदर पदे एवढया मोठ्या प्रमाणावर भरलेली आहेत असे दाखवते मात्र वस्तुस्थिती खूप वेगळी आहे. या सर्वांचा अनुभव धुळे जिल्ह्यात आला असेल. नागपूर, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद अशा ठिकाणीच हे सर्व डॉक्टर्स काम करतात काय, ग्रामीण भागातील जिल्हा मुख्यालयामध्ये हे डॉक्टर्स काम करतात की नाही किंवा तालुकानिहाय हे काम होते काय, याचे वर्गीकरण कसे सांगणार आहात, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, त्यासंदर्भात आता समितीला जी आकडेवारी दिलेली आहे ती एम.बी.बी.एस. डॉक्टर्स बद्दल आहे. त्यामुळे एम.बी.बी.एस. डॉक्टर्सबद्दल आता फारशी काही अडचण नाही. तर आता सार्वजनिक आरोग्य विभागाला विशेष तज्ञांची पदे रिक्त असल्यामुळे अडचण आहे. विशेष तज्ञांची ६२७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी फक्त १६१ पदे भरलेली आहेत. त्यामुळे रिक्त पदांची संख्या तिथे जास्त प्रमाणात आहे असे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले. त्याबाबत समितीने पुढे असे निदर्शनास आणून दिले की, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये देखील वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने राज्यामध्ये एकूण किती पदे रिक्त आहेत याबाबतची सद्यः स्थिती सांगण्यात यावी, त्यासंदर्भात १६३९ पदे रिक्त आहेत असे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीला सांगितले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्ह्याच्या ठिकाणी भेट दिल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये २ पदे मंजूर असतील तर त्यापैकी १ पद रिक्त असते किंवा दोन्ही पदे रिक्त असतात, त्यासंदर्भात आरोग्य विभागाने बिंदुनामावली निश्चित केलेली आहे, त्याची सामान्य प्रशासन विभागामार्फत तपासणी सुरू आहे आणि महिन्याभरामध्ये त्याची जाहिरात काढण्याची संधी मिळेल. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा स्तरावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची परवानगी दिलेली आहे. चार महिन्यापूर्वी माननीय मंत्र्यांनी ज्या आरोग्य केंद्राचे उद्घाटन केले तिथे २ पदे भरली आहेत ते दोन्ही अधिकारी ते पद सोडून गेले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यात ही तळाच्या ठिकाणची वस्तु:स्थिती आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता जिल्हाधिकारी ते पद पुन्हा भरु शकतात असे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस सांगितले.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हाधिकारी ते पद भरत नाहीत. मग आपण प्रत्येक महिन्याला जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेता काय किंवा याची काय पध्दती आहे त्यानुसार समतीला जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करता येईल की, दर महिन्याला भरती करत नाहीत. दुसऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर तेथील डॉक्टर्स सुट्टीवर गेल्यानंतर प्रतिनियुक्ती केली जाते पण येथील पदे रिक्त ठेवली जातात म्हणजे मुळ वस्तु:स्थिती पूर्णपणे वेगळी आहे. ६१५० पदे भरली ती पदे ग्रामीण भागातील नसतील तर ती जिल्हा मुख्यालय किंवा विभागीय मुख्यालयाचीच आहेत. ही सर्व पदे ग्रामीण भागातील भरलेली आहेत असे आश्वस्त करावे, एम.बी.बी.एस. डॉक्टरची ६१ पदे भरलेली आहेत असे उत्तर संबंधित अधिकारी यांनी समितीस दिले असता समितीने याबाबत आश्चर्य व्यक्त केले.

तद्नंतर समितीने अशी माहिती दिली की, नव्याने घटीत झालेल्या पंचायती राज समितीचा ८ जिल्ह्यामध्ये दौरा झाला आहे. ज्या ज्या ८ जिल्ह्यामध्ये समितीने भेटी दिल्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची पदे रिक्त असलेली दिसून आली. विदर्भामध्ये नागपूर किंवा अमरावती या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. अशी एकूण १७०० पदे रिक्त आहेत. बहुतांश डॉक्टर पदव्युत्तर पदवी परिक्षेला जातात. त्यामुळे डॉक्टर त्या ठिकाणी उपस्थित नसतात. ती जागा नियमित दाखवली जाते. डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे अशा बऱ्याच भागात ग्रामीण आरोग्य सेवा व्यवस्थितपणे होत नाही ही वस्तुस्थिती आहे ही ग्रामीण भागातील स्थिती आहे. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात जी वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हायला पाहिजे, ती होत नाही म्हणून हे सर्व तपासण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. शासनाने नेमून दिलेल्या ठिकाणी रुग्णांना वैद्यकीय उपचार वेळेत मिळाल्यास रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन डॉक्टरांनी नियमितपणे काम करणे गरजेचे आहे.

तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विदित केले की, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येत नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सदरहू अधिकार काढून जिल्हाधिकाऱ्यांना तशा प्रकारे परवानगी दिलेली आहे. काही जिल्ह्यामध्ये परवानगी देऊन सुद्धा ठराविक बिंदूचे पद जिल्हाधिकाऱ्यांना मिळाले नसल्यामुळे ती सर्व पदे एकत्र केली आणि सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात जाहिरात काढून माहे डिसेंबर महिन्यात ३३९ जणांना राज्य पातळीवरुन नियुक्ती आदेश निर्गमित केले आहेत, त्यापैकी २३८ जण रुजु झालेले असून १०७ जणांना प्रतिक्षा यादीमधून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू डॉक्टर्स रुजू होताना वाट पाहण्यात येते कारण हे एम.बी.बी.एस. डॉक्टर्स ग्रामीण भागात जाण्यास तयार होत नाहीत, त्यामुळे त्यांना वारंवार सूचना दिल्या जातात आणि ग्रामीण भागातील ग्रामस्थ ते डॉक्टर्स का रुजु झाले नाहीत अशी विचारणा करतात, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कालमर्यादित कार्यक्रम आखून जे डॉक्टर्स वेळेत रुजु होत नसतील त्या ठिकाणी दुसऱ्या कोणाला घेण्याची मुभा असली पाहिजे.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, ६१५० डॉक्टरांची भरलेली पदे ही जिल्हानिहाय, प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय किंवा ग्रामीण रुग्णालय निहाय याबाबतची माहिती प्रधान सचिवांच्या स्वाक्षरीने प्रधान सचिवांनी समितीला जिल्हानिहाय सादर करावी. त्यामध्ये आरोग्य केंद्रनिहाय पदभरती, रिक्त पदे, फरार व निलंबित असलेली पदे अशी सर्व सविस्तर जिल्हानिहाय माहिती १५ दिवसांमध्ये देण्यात यावी.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, धुळे येथे दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१७ या कालावधीत भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालावर साक्ष घेतली. या साक्षीपूर्वी समितीने जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य आणि जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारीक चर्चा केली. धुळे जिल्ह्याच्या भेटीच्या वेळी अशा प्रकारे अनौपचारीक चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी ही गट-अ वर्ग-१ संवर्गातील ४ पदे रिक्त असून धुळे मुख्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची गट-क संवर्गाची ८ पदे रिक्त आहेत आणि प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत गट-क व ड संवर्गातील एकूण २८९ एवढी पदे रिक्त आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी व आर.सी.एस. अधिकारी ही महत्वाची पदे रिक्त असल्याने रुग्णांच्या सेवेवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. तसेच ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये देखील तांत्रिक संवर्गातील २८९ पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सुविधापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या तक्रारीमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे समिती असमाधान व्यक्त करीत आहे.

जिल्ह्यातील रुग्णांना विशिष्ट आजारावर योग्य आणि तात्काळ उपचार होण्यासाठी विशेष तज्ज्ञ डॉक्टरांची (स्पेशालिस्ट) ६२७ पदे मंजूर असताना फक्त १६१ पदे आरोग्य विभागाने भरलेली आहेत व ४६६ पदे रिक्त आहेत. तसेच **ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिका-यांची १६३९ पदे रिक्त आहेत, यावरुन असे दिसून येते की, सार्वजनिक आरोग्य विभागाला ग्रामीण भागातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याबाबत पुरेसे गांभीर्य असल्याचे दिसून येत नाही ही बाब अतिशय चिंताजनक असून मोठ्या प्रमाणावर**

**रिक्त पदे असल्यामुळे आरोग्य सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होतो व जनतेला आवश्यक त्या सोयी-सुविधा मिळत नसल्याने व डॉक्टरही बहुतांश ठिकाणी उपलब्ध नसल्याने सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याची याद्वारे एक प्रकारे हेळसांड होत असल्याचे दिसून येत आहे, यामुळे रिक्त जागांसंदर्भात समिती असमाधान व्यक्त करीत आहे.**

वैद्यकीय अधिकारी गट-अ व ब ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात होती, परंतु सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक २४ जून, २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्यानुसार दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने समुपदेशनाद्वारे वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवड प्रवर्ग निहाय आरक्षणानुसार पात्र वैद्यकीय अधिकारी गट-अ अशा १२ उमेदवारांची पद भरतीची नियुक्ती माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये करण्यात आल्याचे विभागीय सचिवांच्या साक्षीत सांगितल्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.

धुळे जिल्हयात ४१ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून परिस्थिती समाधानकारक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शासनाने थेट मुलाखतीद्वारे निवड व नियुक्ती करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेली असल्याने साधारणतः ३०० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यामुळे रुग्णांना चांगल्याप्रकारे सेवा मिळते. या धर्तीवर संपूर्ण राज्यामध्ये डॉक्टरांची रिक्त पदे तात्काळ भरती करता यावीत याकरिता राज्यातील सर्व ग्रामीण आरोग्य केंद्रे व उप केंद्रांवर करावयाची डॉक्टर्सची भरती थेट मुलाखतीव्दारे करण्याची मुभा व अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असले तरी या रिक्त जागा तातडीने भरण्यासंदर्भात संबंधितांनी पावले उचलावीत, जेणेकरुन **ग्रामीण भागातील रूग्णांना वैद्यकीय सेवेचा त्वरीत लाभ घेता येईल यादृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाने डॉक्टरांची पदभरती नियमावली तयार करावी अशी समिती शिफारस करीत आहे. त्यानुसार याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

### मागासवर्गीय महिलांना १० टक्के निधीतून शिलाई मशिन वाटप न करणे तसेच महिलांच्या प्रशिक्षणासाठी ५० टक्के रक्कम खर्च न करणेबाबत (पंचायत समिती, शिंदखेडा)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षांच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, समाज कल्याण विभागाअंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी रूपये ४८,१६१/- इतकी तरतूद करण्यात आली होती. सदर निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत, याबाबतची माहिती समितीला अवगत करण्यात यावी त्यासंदर्भात प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) यांनी खुलासा केला की, रुपये ४८,१६१/- इतक्या अल्प रकमेमध्ये कोणतीही योजना हाती घेता येत नसल्यामुळे त्या वर्षी निधी खर्च झालेला नाही. यात दोन प्रकारच्या म्हणजे “अ” व “ ब ” अशा योजना असतात. महिलांना एमएससीआयटीचे प्रशिक्षण देण्याचा खर्च हा चार हजार रूपयांपेक्षा जास्त असल्याने त्यांना अशा प्रकारच्या योजनेचा लाभ देता आला नाही. “अ” व “ ब ” प्रकारच्या योजनेमध्ये शिलाई मशिनचा पुरवठा करणे या सारख्या योजनेचा समावेश आहे. यात लाभार्थ्यांकडून १० टक्के अनुदान घेतल्या जाते व ९० टक्के अनुदान जिल्हा परिषद देते. तसेच कुपोषण निर्मुलनासाठी न्युट्रीशन पावडर देणे अशा प्रकारच्या योजना असल्याची माहिती दिली.

समितीने पुढे विचारणा केली की, महिलांना स्वःबळावर काम करण्याकरिता वस्तू खरेदी न करण्याचे कारण काय आहे, त्यासंदर्भात उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, २४ हजार रूपयांमध्ये एकच वस्तू घेता आली असती. अशाने एका गावामध्ये एकच मशीन देता आली असती. परिणाम स्वरूप पाहिजे तशी योजना राबविता आली नसती, त्यामुळे पुढच्या वर्षी योजना राबविली आहे. सध्या संगणकाचे युग आहे. महिलांना एमएसआयटीचे प्रशिक्षण दिले नाही, ६ मुली शिकल्या असत्या तरी त्यांना त्याचा निश्चितच लाभ झाला असता असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने पुढे विचारणा केली की, सन २०१३-१४ या वर्षी किती निधी मंजूर झाला होता, त्यावर्षी शिलाई मशिनची योजना घेतली होती काय, यावर प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी रूपये ६.३४ लाख इतक्या रकमेच्या शिलाई मशिन्स घेतल्या होत्या. तसेच निधी उशिरा प्राप्त झाल्यामुळे महिला व बालकल्याण विभागाचा रूपये ४८,१६१ इतका निधी खर्च करता आला नाही. त्यानंतरच्या पुढील वर्षामध्ये उषा कंपनीच्या ७७ शिलाई मशिन्स खरेदी करण्यात आल्या. एका शिलाई मशिनची किंमत अंदाजे रूपये ७२००/- इतकी होती. या सर्व शिलाई मशिनचे वाटप लाभार्थ्यांना झालेले आहे. सन २०१३-१४ मध्ये रूपये ५,८८,६०५/- इतका निधी मिळाला होता. सदर निधी हा दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी मिळाला आहे. सन २०१३-१४ मध्ये रूपये ६३,८७,४४८/- एवढी रक्कम मिळाली आहे. या रकमेच्या १० टक्के म्हणजे रूपये ६,३८,७४४/- इतकी तरतूद करून शिलाई मशीन्स घेतल्या आहेत. सदर निधी हा उशिराने प्राप्त झाल्यामुळे तो पुढील वर्षी सन २०१४-१५ मध्ये खर्च करण्यात आला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, रूपये ६.०० लाख शिल्लक होते तर त्यातील निम्मे पैसे महिला प्रशिक्षणावर खर्च का केले नाहीत, रूपये ३.०० लाख मधून आपण एमएससीआयटीचा कोर्स का सुरू केला नाही, याबाबत संबंधित अधिकाऱ्यास उत्तर देता आले नाही.

सन २०१२-२०१३ या अहवाल वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी करण्यात आलेली तरतूद खर्च करण्यात आलेली नाही. सन २०१३-२०१४ या वर्षात रक्कम उशिराने प्राप्त झाली. त्यामुळे सन २०१४-२०१५ मध्ये मोठया प्रमाणावर निधी खर्च करण्यात आला आहे याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा करण्यात यावा व योजना राबविण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

शासनाच्या दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी खर्च करण्यात आलेला नाही. याची माहिती श्री.राऊळ, तत्कालिन गट विकास अधिकारी. श्री.कोल्हे, तत्कालिन गटविकास अधिकारी व विद्यमान गट विकास अधिकारी यांना देता आली नाही, तसेच ती माहिती त्यांनी अवगत करुन घेतली नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे, प्रमाणकाप्रमाणे ५० टक्के रक्कम ही महिलांच्या प्रशिक्षणाकरिता खर्च करणे आवश्यक आहे आणि उर्वरित ५० टक्के रक्कम ही वस्तू खरेदीच्या योजनांवर खर्च करणे अपेक्षित आहे. असे न करता सरसकट ७७ शिलाई मशीन्स घेऊन रूपये ६,३८,७४४/- रुपये खर्च करुन अनियमितता करण्यात आली असल्यामुळे यासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने जिल्हा परिषदेकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

१) दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी खर्च न करता ७७ शिलाई मशिन्स घेऊन ६,३८,७४४/-रुपये खर्च करण्याची कारणे काय आहेत ?

२) ५० टक्के रक्कम महिलांच्या प्रशिक्षणाकरिता खर्च का करण्यात आली नाही ?

३) अपंगाच्या योजनेसाठी निधी खर्च केलेला नसल्यामुळे संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) व २) पंचायत समिती, शिंदखेडा येथील मासिक सभा दिनांक २७ मे २०१४ मधील ठराव क्रमांक २४ अन्वये महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित असलेल्या १० टक्के निधीतून शिलाई मशिन लाभार्थ्यांना देण्याबाबत सभागृहात सन्माननीय सदस्य यांचेसमोर चर्चेअंती तालुक्यातून मोठ्या प्रमाणात महिलांचे शिलाई मशिनचे प्रस्ताव प्राप्त झालेले असल्यामुळे निवड झालेल्या महिलांना प्रशिक्षण द्यावे असे सभेचे सचिव यांनी नमूद केले असता त्यावर सन्माननीय सदस्य, श्री. जिजाबराव गोरख सोनवणे यांनी असे सूचित केले की, निवड केलेल्या महिला या मूळात प्रशिक्षितच असल्याने त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता वाटत नाही. त्याऐवजी प्रशिक्षणावरील खर्च हा शिलाई मशिनवरच खर्च करून जास्तीत जास्त महिला लाभार्थ्यांना लाभ देण्याचे सुचविले. त्यावर मा.सभापती यांनी सर्व निवड केलेल्या लाभार्थ्यांकडून शिवण कामाचे प्रशिक्षित महिलांचे शासन मान्य संस्थेचे प्रशिक्षणाचे दाखले घेवून निवड करण्यात यावी असे सुचविले. त्यामुळे प्रशिक्षणावरील खर्च न करता ७७ प्रशिक्षित महिला लाभार्थ्यांना शिलाई मशिन वाटपासाठी निवड करण्यात यावे असे सभागृहात सर्वानुमते सुचित केल्याने ७७ शिलाई मशिन खरेदीवर खर्च करण्यात आला.

सदर प्रकरणी श्री.जी.डी. सोनवणे तत्का.प्र.गट विकास अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येवून, दोषारोप पत्र परिशिष्ट १ ते ४ दिनांक १० मे, २०१८ रोजी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांना सादर करण्यात आले आहे.

३) दिनांक २५ जून, २०१४ **(परिशिष्ट क्र.२.१)ग्रामविकास** विभाग यांचेकडील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी त्यांच्या स्वनिधीच्या एकूण उत्पन्नापैकी ३ टक्के निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता राखून ठेवावे व त्या कारणासाठी वापरावा. सदरची तरतूद सन २०११-१२ पासून करावयाची आहे. तशी तरतूद केली नसल्यास सन २०११-१२ पासुन अनुशेषासह पुढेही तरतुद केली नसल्यास स्वनिधीच्या अर्थसंकल्पात सर्व जिल्हा परिषद व पंचायत समित्या व ग्रामपंचायतीनी करावे असे निर्देशित केलेले आहे.

त्याअनुषंगाने पंचायत समिती शिंदखेड्याच्या सन २०१४-१५ मध्ये प्राप्त स्वःउत्पन्नामधून अपंगांसाठी सन २०१२-१३ मध्ये प्राप्त तरतुदीच्या ३ टक्के रक्कम रु.२३,६५८/-मात्र व सन २०१३-१४ प्राप्त तरतुदीच्या ३ टक्के रक्कम रु.१,६७,९६५/-मात्र आणि सन २०१४-१५ च्या प्राप्त तरतुदीच्या ३ टक्के रक्कम रु.१,२०,९१७/-मात्र असे एकूण रक्कम रु.३,१२,५४०/-मात्र सुधारित अंदाजपत्रकात अनुशेषासह तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार ९७ अपंग लाभार्थ्यांची निवड करून सौर कंदिलाची योजना राबविण्यात आलेली आहे. रुपये ३,१०,४००/-मात्र १०० टक्के खर्च करण्यात आलेला आहे. तसेच सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अपंगांसाठी स्वःनिधी मध्ये तरतूद न केल्यामुळे जबाबदार कनिष्ठ सहाय्यक यांची एक वेतनवाढ बंद करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**१) महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, धुळे यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** महिला व बालविकास विभागाशी संबंधित राबवावयाच्या विविध योजनांबाबतचा ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय दि. २४ जानेवारी, २०१५ रोजीचा आहे. सदर शासन निर्णयानुसार गट “अ” च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी ५० टक्के आणि वस्तू खरेदीच्या योजनांसाठी ५० टक्के निधी खर्च करण्याच्या सूचना आहेत. सदर शासन निर्णयातील गट “ब” च्या योजना (वस्तू खरेदीच्या योजना) नमूद क्रमांक -१६ येथील महिलांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत शिलाई मशिन या सहित्याचा समावेश आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमती आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १६ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, दि. २४ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी खर्च न करता ७७ शिलाई मशिन्स घेऊन ६,३८,७४४/- रुपये खर्च करण्याची कारणे काय आहेत, त्यावर सचिव, महिला व बालकल्याण विभाग यांनी, खालीलप्रमाणे माहिती विशद केली.

पंचायत समिती शिंदखेड्याचा प्रश्न आहे. महिला व बालकल्याण विभागाकडे १० टक्के निधी होता. यामध्ये शासन निर्णय असा आहे की, ५० टक्के साहित्यावर आणि ५० टक्के प्रशिक्षणावर खर्च करावा असे नमूद केलेले आहे. महिला या मुळात प्रशिक्षितच असल्याने त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता वाटत नाही. त्याऐवजी प्रशिक्षणावरील खर्च हा शिलाई मशिनवरच खर्च करून जास्तीत जास्त महिला लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत पंचायत समितीत ठराव देखील घेण्यात आला. त्यानुसार संबंधित गट विकास अधिकारी यांनी संपूर्ण निधी हा शिलाई मशिनवर खर्च केला होता. महिला यापूर्वीच प्रशिक्षित असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देण्यात आले नाही. शासन निर्णयानुसार ५० टक्के निधी प्रशिक्षणावर खर्च करणे अपेक्षित होते, परंतु असे न झाल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याने त्यानंतर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. विभागीय चौकशी यापूर्वीच सुरु झालेली आहे. त्यासंदर्भात विभागाने सुरु केलेल्या विभागीय चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई निश्चित करण्यात आली याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करण्यात यावी असे समितीने निदेशित केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१७ या कालावधीत जिल्हा परिषद, धुळे येथे भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, शिंदखेडा येथे समाजकल्याण विभागांतर्गत मागासवर्गीय महिलांना १० टक्के निधीतून शिलाई मशिन वाटप योजनेमध्ये दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी खर्च न करता ७७ शिलाई मशिन्स खरेदी करून रुपये ६,३८,७४४/- एवढा निधी खर्च करण्यात आला तसेच महिलांच्या प्रशिक्षणासाठी ५० टक्के रक्कम खर्च करण्यात आली नाही. **उपरोक्त शासन निर्णयानुसार ५० टक्के साहित्यावर व ५० टक्के प्रशिक्षणावर खर्च करावा असे नमूद केलेले आहे. तथापि, प्रशिक्षणावरील खर्च हा शिलाई मशिनवरच करण्यात आलेला आहे. रुपये ६,३८,७४४/- एवढी रक्कम सरसकट ७७ शिलाई मशिन्सवर खर्च करण्यात आलेली असून उर्वरित ५०% रक्कम महिलांच्या प्रशिक्षणाकरिता खर्च करण्यात आली नाही. शिलाई मशिन वाटपाबाबत महिला यापूर्वीच प्रशिक्षित झालेल्या आहेत किंवा नाहीत ही बाब संबंधित प्रभारी गट विकास अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा शासन स्तरावर कळविली असती तर त्यांना खर्च न करण्यात परवानगी देणे उचित ठरले असते. यासंदर्भात पंचायत समितीच्या पदाधिका-यांनी प्रशिक्षणावरील खर्च मशिन खरेदी करण्यासाठी करावा असा ठराव घेत असताना संबंधित गटविकास अधिकारी यांनी पदाधिकारी ठराव मांडत असताना शासन निर्णयातील आदेश त्यांच्या निदर्शनास आणून देणे त्यांचे कर्तव्य व जबाबदारी असतानादेखील त्यांनी त्यामध्ये कसुर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्यामुळे समिती याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

**प्रस्तुत प्रकरणी संबंधित प्रभारी गटविकास अधिका-यांनी अपहार अथवा भ्रष्टाचार केलेला नसला तरी कर्तव्यात कसूर केलेला असल्याचे ग्रामविकास विभागाने ही बाब तपासून घ्यावी व नियमानुसार पुढील कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण तीन

### जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

### पंचायत समिती शिंदखेडा अंतर्गत विनापरवानगीने ओ.एम.रुपनर माध्यमिक शाळा सुरू असलेबाबत

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, तालुक्यात विना परवानगीने किती शाळा सुरू आहेत, यावर गट शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, ओ.एम.रूपनर माध्यमिक विद्यालय, बाभळे येथील शाळा सुरू आहे. यासंबंधातील अंतिम अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असून शासनाकडून मार्गदर्शन देखील मागविले आहे. यासंबंधी दिनांक २९ जून, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. त्याची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), धुळे यांना देखील अग्रेषित करण्यात आली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी शाळा बोगस असल्याचे कळविण्यात आले आहे हे खरे आहे काय त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषद, धुळे, सामान्य प्रशासन विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना पाठविलेल्या पत्राबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, त्यासंदर्भात सदर पत्र हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना पाठविले असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उत्तर दिले. तसेच गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ रोजी माध्यमिक विद्यालय, बाभळे या अनधिकृत शाळांविरूद्ध कार्यवाही करण्यासाठी नोटीस देण्यात आली होती काय, त्यासंदर्भात "होय" असे सकारात्मक उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, फौजदारी कायद्यामध्ये काय शिक्षा आहे याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी, त्यासंदर्भात राज्य शासनाच्या परवानगीशिवाय शाळा सुरू करणे ही बाब अयोग्य आहे. त्यामुळे कलम १२ नुसार शाळेची मान्यता काढून घेण्याची नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार स्पष्टीकरण प्राप्त झाले. सदर कृती ही शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १८ (५) नुसार दंडास व फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरल्यामुळे एक लाख रूपयाचा दंड संबंधितांविरूद्ध आकारण्यात आला आहे. यासंबंधात कार्यालयात कागदपत्र सादर करण्यात आली आहेत. त्या कागदपत्रांचा संबंध हा वरिष्ठ कार्यालयाशी म्हणजे मंत्रालयाशी संबंधित होता. त्यामुळे सदरहू कागदपत्रे योग्य आहेत किंवा कसे यासंबंधातील माहिती अद्यापपर्यंत वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झालेली नाही. शाळेची मान्यता काढण्याचा अधिकार हा शिक्षणाधिकारी स्तरावरचा आहे. तो अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नसल्याचे समितीला विशद केले.

समितीने पुढे विचारणा केली की, शिक्षण उप संचालकांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी शिक्षणाधिकारी यांना पत्र पाठविले होते हे आपणास माहीत आहे काय, त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला "होकारार्थी" आश्वस्त केले. या पत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, आपल्या कार्यक्षेत्रात अनधिकृत शाळा सुरू आहे व आपण कोणतीच कार्यवाही केली नाही म्हणजे आपण सदर शाळा सुरू ठेवण्यास अप्रत्यक्ष परवानगी देत आहात असा अर्थ निघतो. वरील बाबीस आपणास जबाबदार का धरण्यात येऊ नये याबाबतचा आपला खुलासा आठ दिवसात या कार्यालयास सादर करावा.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण सदर अनधिकृत शाळेवर तात्काळ दंडात्मक कार्यवाही करून शाळेकडून दंड वसूल करावा व शाळा बंद करण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरून विनाविलंब करण्यात यावी व तसा अहवाल संचालनालयास व या कार्यालयास सादर करावा. खुलासा प्राप्त न झाल्यास आपले याबाबत काहीही म्हणणे नाही असे समजून वरिष्ठ कार्यालयास या कार्यालयाचा अहवाल पाठविण्यात येईल असे समितीस आश्वासित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, धुळे यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग यांनी पत्र लिहून सदर अनधिकृत शाळेवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून शाळेकडून दंड वसूल करावा व शाळा बंद करण्याची कारवाई विनाविलंब करण्यात यावी असे कळविले. शाळा अजूनही सुरू असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता गट शिक्षण अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना हे पत्र मिळालेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणासंबंधी जबाबदारी निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनधिकृत शाळेबाबत शासनाचे सक्त आदेश आहेत. शासनाच्या आदेशाचे पालन न करणे ही अतिशय गंभीर बाब असून हे भेदभावाचे प्रकरण आहे असे मत समितीने व्यक्त केले. तरी यासंबंधातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यामध्ये समितीला सादर करावा व सदर विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली**

पंचायत समिती, शिंदखेडा अंतर्गत विना परवानगीने ओ.एम. रुपनर, माध्यमिक विद्यालय, बाभळे येथील शाळा सुरू असून यासंबंधी दिनांक २९ जून, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी शाळा बोगस असल्याचे कळविण्यात आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ओ.एम.रुपनगर माध्यमिक विद्यालय, बाभळे, ता. शिंदखेंडा, जि.धुळे ही शाळा अनधिकृतपणे सुरू असल्यामुळे बंद करण्याबाबत श्री. दिनेश गुलाबराव पाटील, मुख्य संपादक, दैनिक मताधिकार यांनी शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे तक्रार केली होती. याबाबत दिनांक ८ जुलै, २०१७ अन्वये चौकशी समिती गठीत करून चौकशी करून अहवाल सादर करणे बाबत आदेशित केले होते. त्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. धुळे यांनी दिनांक १८ जुलै, २०१७ अन्वये चौकशी समिती गठीत केली.

चौकशी समितीने उपरोक्त शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुदर्शक अहवाल दिनांक ५ ऑगस्ट, २०१७ अन्वये सादर केला. यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांच्या अभिप्रायासह अहवाल शिक्षण उप संचालक, नाशिक यांना सादर केला आहे. तथापि या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान मंजूर केलेले नाही. मा. शिक्षण संचालक (माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :- मा. शिक्षण** संचालक (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली, त्यावेळी ओ.एम. रुपनर, माध्यमिक विद्यालय, बाभळे, ता. शिंदखेडा ही शाळा अनधिकृतपणे सुरू असल्यामुळे ती बंद करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, ओ. एम. रुपनर, माध्यमिक विद्यालय बाभळे ही शाळा बोगसपणे सुरू असल्याबाबत शिक्षण उप संचालकांकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार शिक्षण संचालकांनी चौकशी समिती गठीत करून सदर प्रकरणी चौकशी करून दिनांक ५ ऑगस्ट, २०१७ रोजी शिक्षण उप संचालकाकडे अहवाल पाठविलेला आहे. त्यानंतर उप संचालकांनी जानेवारी महिन्यात शासनाकडे अहवाल पाठविल्याचे दर्शविले आहे, परंतु शासनाकडे सदर अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

या संदर्भात दैनिक मताधिकारचे संपादक हे शासनाकडून माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मागत असल्याने त्या अनुषंगाने सन २०१३ साली सदर शाळा मंजूर झाल्याचे आदेश काढण्यात आले होते, परंतु त्यासंदर्भात कोणतीही नस्ती कार्यालयामध्ये आढळून आलेली नसल्याने याबाबतची चौकशी करावी लागणार आहे. तसेच मंत्रालयाने उप संचालकांना पत्र पाठविले आहे. या संदर्भात चौकशी केली होती. त्यात २०१३ मध्ये ४-५ महिन्यानंतर उप संचालकांनी त्या संदर्भात पत्र पाठविलेले आहे. त्यानुसार सदर शाळा सुरू झाली आहे. उप संचालकांनी सन २०१३ मध्ये दिलेल्या पत्रात शासनाला सदर पत्राची प्रत निदेशित केलेली आहे, परंतु ते पत्र सुद्धा शासनाकडे प्राप्त झालेले नाही असे प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती विशद केली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, उप संचालकांनी दिलेल्या पत्रावर शाळा सुरू करण्यात आली. तसेच कोणतीही संस्था कार्यरत नसताना त्याबाबतची नस्ती तयार करून सदर शाळा कारवाईसाठी पात्र आहे की नाही हे तपासणे संबंधित यंत्रणेचे काम होते, याबाबत संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा.

यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी असे सांगितले आहे की, आपल्या कार्यालयात सदर नस्ती दिसून येत नाही. तरी सुद्धा मी पुन्हा त्याबाबत तपासणी करून सदर नस्तीचा ८ ते १० दिवसांमध्ये शोध घेऊन त्या संदर्भात पुढील कारवाई करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, राज्यामध्ये अशा प्रकारच्या अनेक शाळा आहेत की, आपल्याला शासनाची परवानगी मिळाली आहे असे त्यांच्याकडून दाखविले जाते. परंतु प्रत्यक्षात त्यांना शासनाकडून कोणतीही परवानगी मिळालेली नसते. त्यामुळे सदर शाळा आपल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळांमध्ये परिक्षेकरिता बसवतात. परिणामी, त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाते. शासनाने यापूर्वी एकाच दिवशी राज्यातील संपूर्ण शाळांची एकाच वेळी पट पडताळणी केली होती. तशाप्रकारे शासनाकडून राज्यातील बोगस शाळा शोधण्याची मोहिम हाती घेतली जाणार आहे काय ? सध्या पालकांची मुलांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे, परंतु अशाप्रकारे राज्यात ३ ते ४ वर्षे बोगस शाळा सुरू असताना शासनाकडे त्याचे कोणतेही अभिलेख उपलब्ध नसणे ही गंभीर बाब दिसून येते. शासनाकडे उप संचालकांकडून प्रस्ताव पाठविला आहे असे सांगितले जाते. परंतु तो प्रस्ताव शासनाकडे येत नाही. त्यामुळे बोगस शाळा शोधण्यासाठी नजिकच्या काळात शासन स्तरावरुन शोधमोहिम हाती घेतली जाणार आहे काय,

याबाबत प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाकडे शाळांची यादी उपलब्ध असते. त्यानुसार दरवर्षी शाळांचा सर्व्हे केला जातो. शासनाने अशा प्रकारच्या शाळा बंद करण्यासंबंधी आदेश काढलेले आहेत. तसेच अनधिकृत शाळांसंबंधी प्रत्येक शाळेसमोर तसेच विविध चौकात ६ X ४ चा फलक लावण्याबाबत संचालकांना सांगितलेले आहे. त्यामुळे जनतेला आता बोगस शाळांबाबत माहिती मिळत आहे. औरंगाबाद येथे विविध चौकांमध्ये अशा प्रकारचे फलक लावलेले आहेत. या संदर्भात जोमाने कार्यवाही सुरू केली आहे. उक्त प्रकरणी उप संचालकांनी आदेश काढून कार्यवाही केली होती. यापुढे सर्व कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. त्यामुळे कोणतीही शाळा असो, ती अधिकृत आहे किंवा नाही ही बाब ऑनलाईन तपासता येणार आहे. यापूर्वी ऑफलाईन व्यवस्था असल्यामुळे असे गैरप्रकार घडले आहेत अशी माहिती समितीला विशद करण्यात आली.

समितीने पुढे विचारणा केली की, तालुका किंवा जिल्हा स्तरावर अनधिकृत शाळांसंबंधी प्रत्येक शाळेसमोर तसेच विविध चौकात ६ X ४ चा फलक लावण्याची जबाबदारी कोणाची आहे, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, या संदर्भात संचालकांनी संबंधित गट विकास अधिकारी व तसेच गट शिक्षणाधिकारी यांना आदेश दिलेले आहेत. त्यानुसार त्यांनी सदरहू फलक लावलेले आहेत. सदर फलक लावण्यासंबंधी खर्च हा अनधिकृत शाळांच्या व्यवस्थापकांकडून करण्यात येतो.

समितीने पुढे विचारणा केली की, धुळे जिल्ह्यात ओ.एम. रुपनर, माध्यमिक विद्यालय, बाभळे ही शाळा बोगसपणे सुरू असल्याबाबत शिक्षण उप संचालकांकडे तक्रार करण्यात आली होती. अशाप्रकारे धुळे जिल्ह्यात अनेक बोगस शाळा सुरु आहेत. यासंबंधी जिल्हा परिषदेने सविस्तर अहवाल दिलेला आहे. संबंधित उप संचालक दोषी आहेत, परंतु त्यांच्याविरुद्ध आतापर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. महाराष्ट्रात अशाप्रकारे अनेक शाळा असू शकतील. सदर प्रकरणी उप संचालकांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे काय अशी साशंकता निर्माण झालेली आहे. उप संचालकांनी दिलेल्या पत्रामुळे सदर शाळा सुरू झालेल्या आहेत, परंतु त्या शाळेसंबंधी इतर कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. ही बाब गंभीर असल्याने आपल्या स्तरावर सदर शाळेची तात्काळ तपासणी करून सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या उप संचालकांविरुद्ध तातडीने कारवाई करावी व केलेल्या कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा.

### अभिप्राय व शिफारशी

समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या धुळे जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील लेखी माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, शिंदखेडा अंतर्गत विना परवानगीने ओ. एम. रुपनर माध्यमिक विद्यालय बाभळे येथील शाळा सुरु असून यासंबंधी दिनांक २९ जून, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे एका दैनिकाच्या संपादकामार्फत ओ.एम.रुपनर माध्यमिक विद्यालय ही शाळा बोगस आहे असे तक्रारीद्वारे कळविण्यात आल्यानंतर ही बाब जिल्हा परिषदेला ज्ञात होणे, यावरुन संबंधित अधिकाऱ्यांची अनास्था, निष्काळजीपणा अथवा जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे बोगस शाळा सुरू ठेवण्यासंदर्भात सहाय्य करण्यात येत असावे या संशयास वाव निर्माण होत आहे. वास्तविकता सदर तक्रारीपूर्वीच बोगस शाळा सुरू असल्याची माहिती संबधितांना असायला हवी होती असे समितीने मत व्यक्त केले.

**धुळे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत शाळा सुरू असल्याबाबत एका दैनिकाच्या संपादकामार्फत तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक ८ जुलै, २०१७ आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी चौकशी समिती गठीत केली. चौकशी समितीने उपरोक्त शाळेस प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुदर्शक अहवाल शिक्षण उप संचालक (माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केलेला**

आहे. मात्र त्यासंबंधात नेमकी कोणती कार्यवाही केली किंवा त्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत समितीला कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे सदरहू अहवालाच्या अनुषंगाने पुढे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांत सादर करण्यात यावी तसेच  शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांनी त्यांच्या स्तरावर सदर अनधिकृत शाळेची तपासणी करून सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी व उप संचालकांविरुद्ध चौकशी करून तातडीने कारवाई करुन त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

वस्तूत जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात अनाधिकृत शाळा सुरू आहेत किंवा कसे याबाबतची माहिती जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांना ज्ञात असणे अपेक्षित असते. मात्र सदर प्रकरणी राजरोसपणे सदरहू अनधिकृत शाळा सुरू आहे. याची जिल्हा परिषदेच्या यंत्रणेला कोणताही माहिती नसणे ही बाब अनाकलनीय व संबंधित अधिका-यांवर संशय येण्याइतपत गंभीर असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

राज्यामध्ये अशा प्रकारच्या अनेक अनधिकृत शाळा सुरू आहेत. सदर शाळांना प्रत्यक्षात शासन मान्यता नसताना देखील शासन मान्यता असल्याचे भासविले जाते. सदर शाळेमधील विद्यार्थ्यांना परिक्षेकरिता दुस-या शाळेत पाठविण्यात येते. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते व विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय होऊ शकते ही सर्व परिस्थिती विचारात घेता अनधिकृत/बोगस शाळांची शोध मोहिम शासनाने हाती घ्यावी व त्यात दोषी आढळणा-या सर्व संबंधितांवर कारवाई करून जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

## प्रकरण चार

## **जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)**

### **मौजे बेटावद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने शौचालयाचे बांधकाम अपूर्ण केल्याबाबत**

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ च्या संदर्भात धुळे जिल्ह्यात दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत भेटी देत असताना समितीने मौजे बेंटावद येथील सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामाची पाहणी केली असता सदर शौचालयाचे काम अपूर्णावस्थेत आढळून आले. शौचालयाच्या सेफ्टी टँकवर झाकण नव्हते म्हणून स्थानिक शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये, सेफ्टी टँक मध्ये लहान मुले खेळताना पडू नयेत म्हणून सेफ्टी टँकवर पत्रा आच्छादला होता. सदर कामाची पाहणी केली असता सदर बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले. सदर काम केव्हा पासून सुरू आहे याची विचारणा स्थानिक नागरिकांकडे केली असता सदर शौचालयाचे काम गेल्या चार वर्षापासून सुरू असल्याचे निदर्शनास आले. सदर काम कोणत्या यंत्रणेकडे आहे याची विचारणा केली असताना उपस्थित अधिकाऱ्यांनी सदर काम जिल्हा परिषदेचे नसून या कामाची यंत्रणा राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याचे निदर्शनास आणून दिले.

सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहे हे त्याच वेळी सांगणे आवश्यक होते. त्या शौचालयावरील सेफ्टी टँक उघडी होती व त्यावर झाकण देखील नव्हते. यावर समितीने असे निदेश दिले की, सदर टाकीवर झाकण घालावे व शौचालयाचे दरवाजे नीट दुरुस्त करून घ्यावेत. समितीने ज्या ज्या कामांना भेटी दिलेल्या आहेत, त्यासंबंधीच्या कामांची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे शौचालयाच्या कामाचा तपासणी अहवाल संबंधित अभिकरणाकडून मागवून घ्यावा व समितीला सादर करावा. यासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली :—**

(१) समितीने पाहणी केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाने शौचालयाचे बांधकाम अपूर्ण केलेले असणे, सेप्टी टँकला झाकण नसणे तसेच सदरहू शौचालयाचे दरवाजे नादुरुस्त असणे या सर्व बाबी समितीस आढळून आल्या होत्या. या प्रकरणास कोण अधिकारी जबाबदार होते. त्याअनुषंगाने संबंधितांवर नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

(२) १० ते ११ घरातील शौचालय एकत्रित करून प्रायोगिक तत्वावर बायोगॅस तयार करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत अहवाल तयार करण्यात आला आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

१) मौजे बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम या निधीतून दहा सिटचे सार्वजनिक शौचालय बांधणे, या कामाचा मक्ता चेअरमन, मल्हार मजूर सह. सो. लि. धुळे यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो) धुळे यांच्यामार्फत देणेत आलेला होता. सदरचे काम दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी पूर्ण व अंतिम करणेत आले होते. सदर कामाचा दोष निवारण कालावधी १२ महिन्यांचा होता. काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी कामाची नियमित देखभाल दुरूस्ती व परिक्षण करण्याकरिता सदरची इमारत ग्रामपंचायत बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे यांच्याकडे हस्तांतरित करणेत आलेली होती. दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी पंचायती राज समितीच्या भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी ग्रामपंचायत बेंटावद, ता. शिंदखेडा, जि.धुळे यांनी दुरुस्ती केलेल्या आहेत (सेप्टीक टँकवर झाकण बसविले असून शौचालयाच्या दरवाज्यांची दुरूस्ती केलेली आहे.) आज रोजी सदरच्या इमारतीचे काम सुस्थितीत आहे. सदर शौचालयाच्या नादुरुस्ती संदर्भात चौकशी केली असता सदर शौचालयाबाबत स्थानिकांमध्ये असंतोष असल्यामुळे जाणीवपुर्वक अज्ञात व्यक्तीने पंचायती राज समितीच्या भेटी पूर्वीच्या लगतच्या कालावधीत मोडतोड केलेली असल्याची बाब निदर्शनास आल्याने कोणत्याही कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही.

(२) १० ते १२ शौचालये जोडून त्यापासून बायोगॅस निर्माण करणे शक्य आहे, तथापि, त्यासाठी कम्युनिटी (community boigas plant) बायोगॅस संयंत्र आस्थापित करणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार वैयक्तिक लाभ देण्यात येत असून यामध्ये कम्युनिटी बायोगॅस संयंत्रे आस्थापित करण्याची बाब समाविष्ट नाही.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) जि.प.च्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

(२) (योजना-१) जि.प.च्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

धुळे जिल्हा परिषदेस समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत दिलेल्या भेटीच्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मौजे बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील शौचालयाच्या सेफ्टीक टँकचे झाकण उघडे असणे व दरवाजे नादुरुस्त अवस्थेत असल्याचे समितीच्या निदर्शनास आल्याने त्यावेळी समितीने चौकशीचे आदेश दिले असता धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, पंचायती राज समितीच्या भेटीच्या वेळी बेटावद ग्रामपंचायतीने दुरुस्ती केलेल्या आहेत. सदरहू सेफ्टीक टँकवर झाकण बसविले असून शौचालयाच्या दरवाज्याची दुरुस्ती केलेली आहे. परंतु स्थानिकांमध्ये असंतोष असल्यामुळे जाणीवपूर्वक अज्ञात व्यक्तीने पंचायती राज समितीच्या भेटीपूर्वी मोडतोड केल्याची बाब निदर्शनास आल्याने कोणत्याही कर्मचाऱ्यावर कारवाई केली नाही. सदरहू कामाचा दर्जा निकृष्ट असणे, काम विहित वेळेत पूर्ण न करणे, शासकीय यंत्रणेचे शौचालयाच्या बांधकामाकडे दुर्लक्ष असणे इत्यादी कारणास्तव अज्ञात व्यक्तीने हे कृत्य केले असावे असा निष्कर्ष समितीस दिला. तथापि, सदर खुलाशाबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहे.

तथापि, सदर खुलासा वस्तुस्थितीवर आधारित दिसून येत नाही. कारण कामाचा दर्जा निकृष्ट असल्यामुळे व विहित वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे तसेच शासकीय यंत्रणेचे या कामाकडे दुर्लक्ष असल्यामुळे मौजे बेटावद येथील शौचालय अपूर्ण अवस्थेत असल्याची स्पष्ट कबुली जिल्हा परिषदेने खुलाशाद्वारे केली आहे. यावरून असे दिसून येते की, **मौजे बेटावद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेली शौचालये निकृष्ट दर्जाची असून संबंधितांनी दुर्लक्ष केल्यामुळे त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था नसून शौचालयाची देखभाल ही होत नसल्याने शौचालयात दुर्गंधी येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला शौचालयाचा वापर करण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुध्द कारवाई करण्याता यावी अशी समितीची शिफारस आहे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यांच्या आत सादर करावा.**

एचबी १६०९-४अ

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

### जिल्हा परिषदेचे स्व:उत्पन्न

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या साधनातून स्थानिक कर, वैद्यकीय व कृषी या विभागांना प्रत्यक्ष प्राप्त रक्कम दर्शविण्यात आली नसून जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकाप्रमाणे या सर्व उत्पन्नाच्या साधनातून किती रक्कम प्राप्त होणे अपेक्षित होते, ती प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत, याबाबत प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-१३ या वर्षामध्ये ५.०२ कोटी रुपये उपकराची रक्कम प्राप्त झाली. तसेच मुद्रांक शुल्क व उपकराची रक्कम शासनाकडून निश्चित केली जाते. अहवाल वर्षामध्ये स्थानिक कर प्राप्त झाला नाही.

तद्नंतर प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेने ७% वन अनुदानातून सन २०११-१२ व २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये सौर पथदिवे बसविणे, सौर कंदिल ९० टक्के अनुदानावर बसविणे अशा योजना हाती घेऊन त्या पूर्ण केल्या आहेत. सदरहू योजनेचे अनुदान कालांतराने ५ ते ७ हजार रुपये इतके कमी करण्यात आले. वन विभागामध्ये सुविधा पुरविण्याकरिता जिल्हा परिषदेला अनुदान देण्यात येते, त्यामधून वन विभागातील क्षेत्रामध्ये सुविधा पुरविण्यात येतात. तसेच वन विभागाकडून जिल्हा परिषदेला वन विभागातील गावांना सुविधा देण्याकरिता निधी देण्यात येतो व सदरहू निधी यादीनिहाय संबंधित गावांमध्येच खर्च करावयाचा असतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, किती गावांना सौर कंदिल पुरवठा करण्यात आला आहे व सदरहू सौर कंदिल सुरू आहेत काय ? याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विदित केले की, सन २०११-१२ मध्ये १४ व सन २०१२-१३ मध्ये १६ गावांना सौर कंदिलांचा पुरवठा करण्यात आला आहे व ते सुरू आहेत. सन २०११-१२ मध्ये खरेदी केलेल्या एका सौर पथ दिव्याची किंमत २०,५०० रुपये आहे. सदरहू योजना व्यवस्थितपणे चालू राहावी याची खबरदारी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यायची आहे. सौर पथ दिवे सुरू असल्याची माहिती पुन्हा एकदा पाहणी करुन खात्री करण्यात येईल. तसेच सौर पथ दिवे सुरू असल्याबाबतची पाहणी करुन सद्यःस्थितीचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल. सदरहू सौर पथ दिवे जे.एल.कंपनीकडून खरेदी करण्यात आले असून त्यांनी वॉरंटी कालावधी दिलेला नाही असे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली असता सदरहू सौर पथ दिव्यांची १० वर्षे वॉरंटी आहे अशी माहिती बैठकीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी दिलेली आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले. तसेच एका पथ दिव्याची किंमत किती आहे, एक नग सौर पथ दिव्याची किंमत २०,५०० रुपये आहे तसेच सौर पथ दिवे बसविणे व सौर कंदिल पात्र लाभार्थींना वाटप करणे या योजना देखील राबविण्यात आलेल्या आहेत अशी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस माहिती दिली.

तद्नंतर जिल्हा परिषदेने वन विभागाकडून प्राप्त ७ टक्के अनुदानातून खरेदी केलेल्या सौर पथदिव्यांचा खर्च २.९३ लाख रुपये दर्शविला असून त्या रक्कमेमध्ये सन २०१०-११ मध्ये १४ सौर कंदिल वाटप केले आहेत तसेच सौर पथ दिव्यांच्या बाबतीत ५ व १० वर्षांच्या वॉरंटीबाबत माहिती देण्यात आली आहे असे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस अवगत केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सौर पथ दिव्यांच्या बाबत दोन प्रकारची वॉरंटी देण्यात येते, त्याची माहिती जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना आहे काय ? समितीच्या बैठकीमध्ये ५ वर्षांची वॉरंटी बॅटरीची व १० वर्षे वॉरंटी सोलर पॅकेजची आहे. त्यासंदर्भात आढावा घेऊन सद्यःस्थितीची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश दिले.

ज्या गावामध्ये सौर पथ दिवे लावलेले आहेत, परंतु सदरहू सौर पथ दिवे बंद असल्याची माहिती ग्रामस्थांनी ग्रामसेवकाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर ग्रामसेवकांनी सौर पथ दिवे बंद अवस्थेत असल्याचे वरिष्ठांना कळविणे आवश्यक आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, धुळे जिल्ह्यातील सौरदिव्यांची चौकशी करावी व अस्तित्वात असलेल्या सौरदिव्यांची चौकशी करून दोन महिन्यात समितीस अहवाल सादर करावा. सदरहू विषय राज्य स्तरावर घेण्याची गरज असून सौर दिव्यांवर शासन कोट्यावधी रुपये खर्च करीत असल्याने या विषयावर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

(१) जिल्ह्यात सौर दिव्यांसाठी एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली, सध्या अस्तित्वात किती सौर दिवे आहेत याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

(२) तसेच सौर पथदिवे बसवितांना बॅटरी चोरीला जाऊ नये याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) धुळे जिल्ह्यातील समाजकल्याण विभागामार्फत रक्कम रु.२,९९,२०० सौर दिव्यांसाठी खर्च करण्यात आलेली आहे. एकूण १६ सौर पथदिव्यांपैकी १० सद्यः स्थितीत अस्तित्वात आहे व ६ सौर पथदिवे बंद आहेत.

२) सौर पथ दिवे बसवितांना बॅटरी चोरीस जाऊ नये यासाठी उपाययोजना करणेबाबत संबंधित ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासनाची सहमती आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, धुळे जिल्हा परिषदेमध्ये ७% वन अनुदानातून सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये सौर पथदिवे व ९०% अनुदानावर सौर कंदिल घेण्यात आल्या बसविणे अशा योजना हाती आला होत्या. सदरहू योजनेचे अनुदान कालांतराने ५ ते ७ हजार रुपये इतके कमी करण्यात आले. वन विभागामध्ये सुविधा पुरविण्याकरिता जिल्हा परिषदेला अनुदान देण्यात येते, त्यामधून वन विभागातील क्षेत्रामध्ये सुविधा पुरविण्यात येतात. त्यानुसार सन २०११-१२ मध्ये वन विभागातील १४ गावांना व सन २०१२-१३ मध्ये १६ गावांना सौर कंदिलांचा पुरवठा करण्यात आला असून एका सौरपथ दिव्याची किंमत २०,५००/-रुपये आहे. सौर पथदिवे ४-५ वर्षापूर्वी बसविण्यात आलेले असून ते सुरू असल्याची माहिती तसेच त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे किंवा कसे याबद्दल समाजकल्याण अधिकारी अनभिज्ञ असल्याचे समितीस आढळून आले.

राज्यामध्ये बहुतांश जिल्ह्यांमध्ये बसविण्यात आलेल्या सौर पथदिव्यांच्या बॅटरीची चोरी झाल्यामुळे सदर सौर पथदिवे कार्यान्वित नसून त्यांचा उपयोग होत नाही. त्यामुळे **धुळे जिल्ह्यामध्ये सौर पथदिवे बसविताना बॅटरी चोरीला जाऊ नये याकरिता योग्य ती खबरदारी घेऊन उपाययोजना करणे आवश्यक होते. तसेच महत्वाची बाब म्हणजे सदर सौर पथदिवे ज्या कंपनीकडून खरेदी करण्यात आलेले आहेत. त्या कंपनीचा देखभाल दुरुस्तीचा काळ किती वर्षापर्यंत आहे ही माहितीदेखील संबंधित अधिका-यांना देता आली नाही त्यामुळे समिती याबद्दल तीव्र असमाधान व्यक्त करीत आहे.**

**सन २०११-१२ मध्ये धुळे जिल्हा परिषदेने वन विभागाकडून प्राप्त ७% अनुदानातून खरेदी केलेल्या १४ सौर कंदिलाकरीता रुपये २.९३ लक्ष एवढा खर्च केलेला असून सन २०११-१२ मध्ये १५ सौर कंदिलाकरिता किती रुपये खर्च करण्यात आला आहे. तसेच सदर सौरकंदिल/पथदिवे वितरीत केलेल्या लाभार्थ्यांची गावनिहाय यादी समितीस पाठविण्यात आली नाही. सौरकंदिलांची देखभाल दुरुस्ती नियमितरित्या करण्यात येऊन सौर पथदिवे व्यवस्थितरित्या सुरू आहेत किंवा कसे याबाबतची माहिती देखील समितीला पाठविण्यात आलेली नाही. उपरोक्त दोन्ही बाबतची माहिती व सौर दिव्यांची वारंटी किती होती इत्यादी बाबी समितीसमोर येणे अत्यंत आवश्यक होते. उपरोक्त सर्व बाबींसंदर्भात जिल्हा परिषद प्रशासन उदासीन असून गैरव्यवहार करणा-याला पाठीशी घालत आहे की काय अशी समितीला शंका येत आहे. जर अनियमिततेबाबत वेळीच कारवाई झाली नाही तर ती पुढे तशीच सुरू राहते व पर्यायाने प्रशासन कोसळते अशी समितीची धारणा आहे. म्हणून या प्रकरणात सर्वसंबंधीत अधिकारी व कंत्राटदार यांची सर्वकष चौकशी करण्यात यावी. व सर्व संबंधिताविरूद्ध जबाबदार कडक स्वरुपाची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सहा

## **जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)**

### **जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक**

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, २०५३.१२३१ मानव विकास योजनेत २५.४२ लक्ष रुपये उशिरा प्राप्त होण्याची कारणे काय आहेत, २२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता व २२१६ गृहनिर्माण, २५०१ आदिवासी भागातील यात्रास्थळ विकास व ४२५० इतर सामाजिक सेवा या लेखाशीर्षाखाली योजनेबाबत निधी न घेण्याची कारणे काय आहेत. तसेच २०५३-१२९४ या लेखाशीर्षाखाली अंगणवाडी बांधकाम या योजनेत निधी का प्राप्त झाला नाही.

त्यासंदर्भात प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी खुलासा केला की, जिल्ह्यात नियमित अंगणवाडया १९१३ व मिनी अंगणवाड्या १९१ आहेत. स्वतंत्र इमारत असलेल्या अंगणवाड्या १५९५, इतर सरकारी इमारतीमध्ये भरणाऱ्या नियमित अंगणवाडी २५८ व मिनी अंगणवाड्या ४१ असून खाजगी इमारतीमध्ये भरणाऱ्या नियमित अंगणवाड्या ५२ तर मिनी अंगणवाड्या २६ आहेत. उघड्यावर भरणाऱ्या अंगणवाड्या अहवाल वर्षात २३० होत्या, परंतु ती संख्या कमी होऊन १३२ वर आलेली आहे. या वर्षी ७९ अंगणवाडया मंजूर आहेत तर १७५ अंगणवाड्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाकडून सदरहू योजनेस एकूण किती निधी प्राप्त झाला, त्यासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी या वर्षी डीपीसीने १ कोटी ६५ लाख रुपये मंजूर केलेले आहेत. आदिवासी विकास विभागाचा निधी अद्याप यावयाचा आहे. या वर्षी १७५ अंगणवाड्या मंजूर झालेल्या आहेत. यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सन २०१७-२०१८ या वर्षाचा अर्थसंकल्प ९ कोटी ५९ लाख रुपये असल्याबाबतची माहिती समितीस दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे सेस उत्पन्न दरवर्षी वाढले पाहिजे. जिल्हा परिषद उत्पन्नाचे स्त्रोत वाढवत नाही किंवा उत्पन्न संतुलित करीत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. जिल्हा परिषदेची मालमत्ता किती आहे, त्यामध्ये कौलारु व स्लॅबच्या इमारती किती आहेत, तसेच सदरहू इमारतीचे वार्षिक भाड्यापोटी किती रक्कम शासनास प्राप्त होते. त्यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, बांधकाम विभागाकडे शिरपूर येथे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिरपूर यांना इमारत भाड्याने दिलेली आहे असे समितीस अवगत केले.

जिल्हा परिषदेला त्यांची एकूण मालमत्ता किती आहे, याबाबत समितीला सविस्तर अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले. तसेच शहादा येथे देखरेख संघाला जागा दिली होती. त्यांनी त्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधून त्याचे भाडे ते स्वतः घेत आहेत. पंचायत समितीला किंवा जिल्हा परिषदेस काहीही भाडे देत नाहीत अशा तक्रारी समितीस प्राप्त झाल्या असता याबाबतची सखोल चौकशी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तात्काळ सादर करावा. तसेच त्यासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेची एकूण मालमत्ता किती रक्कमेची आहे. याबाबतचा संपुर्ण अभिलेख (Record) समितीस देण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत मालमत्तेविषयी माहितीचा तपशिल

| जिप/पंस इमारती | जिल्हा परिषद शाळा | ग्रापं कार्यालय/ग्राम सचिवालय/इतर इमारती (शॉपींग गाळे) अमरधाम | समाज मंदीर कोंडवाडा/ अंगणवाडी | आरोग्य केंद्र/ आरोग्य उपकेंद्र | पशु वैद्यकीय दवाखाना/गुरांचा दवाखाना | पाझर तलाव/ गाव तलाव साठवण बंधारे | खुल्या जागा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | १०४४ | ३७६९ | १७२५ | २६४ | ७४ | १४०२ | ९४२ | ९२८६ |

जिल्हा परिषद स्तरावरील मालमत्तेबाबत त्या त्या विभाग स्तरावर दस्तऐवज/नोंदवह्या अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. तसेच पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरावरील दस्तऐवज/नोंदवह्या त्या त्या स्तरावर अद्ययावत करून ठेवण्यात आलेल्या आहेत. मालमत्ता नोंदवहीची एक प्रत ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, धुळे स्तरावर ठेवण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरावरील मालमत्ता व जमिनी किती रकमेच्या आहेत याबाबतची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-११) जिल्हा परिषदेच्या मालमत्ता व त्यांचे मुल्यांकन इत्यादी माहिती व्यापक स्वरुपात असून सदरहू माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, धुळे येथे दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, धुळे जिल्हा परिषदेचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा अर्थसंकल्प ९ कोटी ५९ लक्ष रुपये असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मालकीच्या एकूण ६६ इमारती, १०४४ जिल्हा परिषद शाळा, ३७६९ ग्रामपंचायत कार्यालये/ग्रामसचिवालय/इतर इमारती, १७२५ समाज मंदीरे/अंगणवाडी, २६४ आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, ७४ पशुवैद्यकीय दवाखाने, १४०२ पाझर तलाव/गाव तलाव/साठवण बंधारे व ९४२ खुल्या जागा आहेत. **धुळे जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा शहादा तालुक्याच्या ठिकाणी देखरेख संघाला दिली होती. त्याठिकाणी खरेदी संकुल (शॉपिंग कॉम्प्लेक्स) बांधण्यात आले असूनदेखील त्या जागेचे उत्पन्न धुळे जिल्हा परिषदेला प्राप्त होत नाही, ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची असून याप्रकरणी समिती तीव्र असमाधान व्यक्त करीत आहे.**

**प्रस्तुत प्रकरणी देखरेख संघाकडून धुळे जिल्हा परिषदेस किती रुपयांची रक्कम व किती कालावधीपासून वसूल करणे बाकी आहे, याबाबत चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे धुळे जिल्ह्यात जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्राम पंचायत यांच्या मालकीच्या किती मालमत्ता व जमिनी व त्यांची बाजार भावाप्रमाणे एकूण अंदाजित किंमत किती आहे या बाबतची सर्वंकष अद्ययावत माहिती समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

### जवाहर रोजगार हमी योजनेच्या अपहार प्रकरणातील वसुलीबाबत

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेतील २२१० सरपंचांपैकी १९२ सरपंच तसेच एकूण ३०३ ग्रामसेवकांपैकी २६४ ग्रामसेवक गैरव्यवहारातील प्रकरणात दोषी आढळून आल्यामुळे वसुलीच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे, त्यासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणी ग्रामसेवकांच्या वेतनातून वसुली सुरू केली आहे. तसेच सरपंच यांच्या मालमत्तेवर अपहाराच्या प्रमाणात ५० टक्के बोजा चढविण्याचे परिपत्रक काढण्यात आले आहे. जे ग्रामसेवक सद्यः स्थितीत कार्यरत आहेत त्यांच्याकडून अपहाराच्या वसुलीच्या ५० टक्के व सरपंच यांच्या मालमत्तेवर ५० टक्के बोजा चढविण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

तद्नंतर समितीच्या निदर्शनास आले की, प्रत्यक्षात ग्रामसेवकांच्या वेतनातून वसुली झाल्याबाबतचे एकही प्रकरण दिसून आले नाही. जिल्हा परिषद ज्या कर्मचाऱ्यांना वेतन देते त्या अपहार प्रकरणातील दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अपहाराची रक्कम वसूल केली पाहिजे. उक्त अपहार प्रकरणातील काही मयत कर्मचारी यांना सुद्धा नोटिसा दिल्याची माहिती समितीला भेटीच्या व साक्षीच्या वेळी निदर्शनास आली असता समितीने अपहार प्रकरणातील रक्कम एका महिन्याच्या आत वसूल करण्याचे आदेश दिले होते, त्याबाबत किती रक्कम वसूल केली व किती रक्कम येणे बाकी आहे. तसेच एका कर्मचाऱ्याकडून १४ लाख रुपये वसुल करावयाचे असून त्याच्या सेवानिवृत्ती देय वेतनातून उक्त रक्कम वसूल करणे आवश्यक असल्याचे समितीने निदेश दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शिंदखेडा येथे २४ लाख रूपयांचा अपहार झाल्याचे एक प्रकरण आहे. त्यामधील १२ लाख रूपयांची वसुली शिल्लक असल्याने त्याबाबतची सद्यःस्थिती समितीस कळवावी. तसेच ४०२ सरपंच व ५६७ ग्रामसेवक यांचेकडून अपहाराची रक्कम वसूल करण्यासाठी त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात यावा ? तसेच भविष्यात अपहार होऊ नये याकरिता सरपंचांवर व ग्रामसेवकांवर अंकुश ठेवण्याची आवश्यकता असल्याने सदरहू अपहार रक्कम वसुली प्रकरणी संबंधित सरपंच व ग्रामसेवकांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात यावा.

तद्नंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेत १४० ग्रामसेवक व सरपंच यांचा अपहार प्रकरणांशी संबंध आहे, त्यांचेकडून २०.६४ लाख रुपये रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदरहू वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. जवाहर रोजगार हमी योजनेतील अपहार प्रकरणातील २ कोटी ३९ लाख रुपयांची वसुली होणे बाकी आहे. अपहार प्रकरणातील एकूण वसूलपात्र रक्कम साडे तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. सदरहू प्रकरणी फौजदारी खटला दाखल करण्यात यावेत, तसेच अपहार वसुली प्रकरणी कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

जवाहर रोजगार हमी योजनेच्या अपहार प्रकरणातील २ कोटी ३९ लाख रुपये रक्कमेची वसुली होणे बाकी होती, सदरहू वसुली पात्र एकूण रक्कम ३ कोटी ५० लाखांपेक्षा अधिक असून ती वसूल करण्यात आली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,तसेच संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

**जवाहर रोजगार हमी योजनेतील अपहार प्रकरणांचा तपशील**

सन २०११-१२ अखेर १६८ प्रकरणांत रुपये २,६९,२२,२७५ मात्र रक्कम गुंतलेली आहे.

| एकूण अपहारित प्रकरण | | निकाली काढण्यात आलेली | | प्रलंबित प्रकरणे | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| प्रकरणे | रक्कम | प्रकरणे | वसुल/समायोजित रक्कम | | |
| १६८ | २,६९,२२,२७५ | ३९ | ५०,३२,११६ | १२९ | २,१८,९०,१५९ |

**प्रलंबित प्रकरणे व त्यात गुंतलेले ग्रामसेवक व त्या रक्कमांचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | प्रकरणे | गुंतलेल्या रक्कमा |
|---|---|---|---|
| १ | मयत ग्रामसेवक | ०५ | ९,४५,४७५ |
| २ | न्यायप्रविष्ठ/पोलिस गुन्हे दाखल | १२ | ३५,४७,२२७ |
| ३ | सेवानिवृत्त ग्रामसेवक | ७३ | ९९,७६,७२६ |
| ४ | वसुलीची कार्यवाही सुरू असलेले | २४ | ३७,२९,८९५ |
| ५ | विभागीय चौकशी प्रस्तावित प्रकरणे | १५ | ३६,९०,८३६ |
| | **एकूण** | **१२९** | **२,१८,९०,१५९** |

जवाहर रोजगार हमी योजनेच्या प्रलंबित प्रकरणांत गुंतलेल्या रकमांची वसुलीची कार्यवाही सुरु असून प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त -९) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, धुळे येथे दिलेल्या भेटीच्या वेळेस प्राप्त झालेल्या माहितीच्या मुद्यांवर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ व १६ मे २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, जलसंधारण व रोजगार हमी योजना विभाग यांनी, १४ क्रमांकाचा मुद्दा जवाहर रोजगार हमी योजनेतील अपहार प्रकरणांशी संबंधित असल्याचे सांगितले. तद्‌नंतर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी खुलासा केला की, हे खूप जुने प्रकरण आहे. यामध्ये १६८ प्रकरणात सुमारे २,६९,२२,२७५/- रक्कम गुंतलेली आहे. त्यातील ३९ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. सदरहू प्रलंबित १२९ प्रकरणे शासन स्तरावर तात्काळ निकाली काढण्यात यावी व सद्य:स्थितीचा सविस्तर अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, धुळे येथे दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, २२१० सरपंचापैकी १९२ सरपंच व ३०३ ग्रामसेवकांपैकी २६४ ग्रामसेवक गैरव्यवहारामध्ये दोषी आढळून आल्याने सदरहू ग्रामसेवकांच्या वेतनातून वसुली सुरु आहे. तसेच संबंधित दोषी सरपंचांच्या मालमत्तेवर ५०% बोजा चढविण्याचे परिपत्रक आहे. जे ग्रामसेवक सद्य:स्थितीत कार्यरत आहेत त्यांच्याकडून अपहाराच्या वसुलीच्या ५० टक्के व संबंधित सरपंचांच्या मालमत्तेवर ५० टक्के बोजा चढविण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. तथापि, प्रत्यक्षात सदर ग्रामसेवकांच्या वेतनातून वसुली झाल्याबाबतचे एकही प्रकरण समितीला दाखविण्यात आले नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

जिल्हा परिषद ज्या कर्मचा-यांना वेतन देते त्या प्रलंबित १२९ अपहार प्रकरणातील दोषी कर्मचा-यांच्या वेतनातून अपहाराची रक्कम केवळ नोटीस देऊन कारवाई झाल्याचे भासवून देण्याऐवजी प्रत्यक्षात जिल्हा परिषदेने अपहार प्रकरणामध्ये गुंतलेली एकूण रक्कम रुपये २,६९,२२,२७५ वसुल करणे आवश्यक आहे. तसेच अपहार प्रकरणातील काही कर्मचारी मयत झाल्यानंतर नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे वसुलीची कारवाई करण्यास संबंधितांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे **ज्या अधिका-यांनी वसुलीसाठी विलंब केला आहे त्यांच्याविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. ज्या सेवेत कार्यरत कर्मचा-यांकडून अद्याप वसूली करण्यात आली नाही त्यांच्या वेतनातून व जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून उक्त रक्कम वसूल करण्यात यावी आणि अपहार प्रकरणामध्ये दोषी आढळून आलेल्या १९२ सरपंचांच्या मालमत्तेवर बोजा चढवून त्याप्रमाणे ५० टक्के वसूली तातडीने करण्यात यावी.**

**तसेच गैरव्यवहाराच्या प्रकरणी न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे व विभागीय चौकशीकरिता प्रलंबित असलेल्या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर रक्कम गुंतलेली आहे. न्यायालयीन प्रकरणात स्थगिती आदेश असल्यास न्यायालयात जलदगतीने प्रकरणे निकाली काढण्यासाठी कारवाई करावी व ज्या प्रकरणात स्थगिती आदेश नाहीत त्या प्रकरणात न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात यावी तसेच विभागीय चौकशीची प्रकरणे तातडीने निकाली काढून त्यात गुंतलेली रक्कम त्वरेने वसुल करावी व सरपंच यांच्याकडे असलेली अपहारीत रक्कम देखील कायद्याच्या चौकटीत राहून वसुल करावी व या वसुलीचा अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

एचबी १६०९-५

## प्रकरण आठ

## **जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)**

### **शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत**

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, मुख्यालयी राहत नसलेल्या ८९ शिक्षकांच्या घरभाडे भत्त्यांची एकूण रक्कम किती आहे व सध्या किती शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत, याबाबत त्यांच्यावर कोणती कारवाई केली. उक्त प्रश्नाबाबत तक्त्यामध्ये नमूद करण्यात आलेली आकडेवारी बरोबर आहे काय, धुळे तालुक्यातील मुख्यालयी राहत नसलेल्या शिक्षकांची संख्या निरंक दर्शविण्याची कारणे काय आहेत ?

यासंदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस माहिती दिली की, ८९ शिक्षक मुख्यालयी राहत नव्हते त्यांच्या विरोधात १ ते ४ परिशिष्ट भरुन खुलासे मागविण्यात आले होते. त्यांची घरभाडे रोखल्याची एकूण रक्कम २१,०२,९८१ रुपये एवढी आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, जळगाव यांनी माननीय उच्च न्यायलायामध्ये याचिका दाखल केली असता माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या निर्णयान्वये उक्त शिक्षकांचा घरभाडे भत्ता पुर्ववत सुरू करण्यात आला आहे. माननीय उच्च न्यायलयाने निष्कर्ष काढला आहे की, शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ फेब्रुवारी १९९०, परि.क्र.४ मधील तरतूद ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ७ जुलै २००८ व दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या परिपत्रकामुळे अधिक्रमित होत नाही. त्यामुळे उक्त सन १९९० च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४ मधील तरतुदीनुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय असून तो रोखून ठेवला असल्यास तात्काळ अदा करावा असे आदेशित करण्यात आले आहे. त्याचा परामर्श घेऊन शासनाने दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. याबाबतचा " शासन निर्णय क्रमांक : वेपूर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५.४.१९८८ मधील व शासन निर्णय क्रमांक : घभाभ-१०८९/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ५.२.१९९० मधील " ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात, घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे. ही तरतूद वगळण्यात येत आहे असे नमूद केले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू शासन निर्णयानुसार किती कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे तसेच सदरहू तरतुद कोणती होती, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी असा खुलासा केला की, दिनांक ५ फेब्रुवारीच्या शासन निर्णयामध्ये तरतूद होती की, ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे. तेव्हा ती काढून टाकलेली होती आणि ही तरतूद आता ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयामध्ये वगळण्यात आली आहे. सदरहू विषय गंभीर आहे. दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून त्यांचे घरभाडे भत्ते बंद केले नाही.

तद्नंतर समितीने असे निदेश दिले की, जे शिक्षक मुख्यालयी राहत नसतील त्यांच्यावर एक महिन्यात कारवाई करावी व समितीला आढळून आले की, धुळे तालुक्यामध्ये सर्व शिक्षक मुख्यालयी राहत असल्याचे दाखविले आहे ही माहिती चुकीची आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच सदरहू शासन निर्णय वित्त विभागाने काढलेला आहे. या संदर्भात पंचायती राज समितीच्या वेगवेगळ्या शिफारशी आहेत. या शासन निर्णयामध्ये संदिग्धता आहे. तेव्हा वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष घेणे आवश्यक आहे. तसेच गटातील कार्यरत शिक्षकांची संख्या ७३५ पैकी मुख्यालयी राहत असलेल्या शिक्षकांची संख्या ७३५ दाखविण्यात आलेली आहे. ज्यांनी ही चुकीची माहिती दिली आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आयएएस अधिकारी असतात. आपण त्यांचा सल्ला घेणे आवश्यक होते तसेच जिल्हा परिषदेकडे सल्ल्याकरिता वकिलाची नेमणूक केली असून ज्या कायद्याचा अर्थ समजत नाही त्याचा अर्थ सांगणारी यंत्रणा आहे. त्यासाठी वकिलांना फी दिली जाते. वकिलांना विचारणा करण्यात आली नाही, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे असे दिसून येते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ८९ शिक्षकांच्या बाबतीत निर्णय कधी झालेला आहे. कायद्याप्रमाणे घरभाडे भत्ता वसूल केलेला नाही, यासाठी जिल्हा प्रशासन जबाबदार आहे काय तसेच समिती असे नमुद करू इच्छिते की, साक्री येथे शाळा तपासणीसाठी समिती गेली असताना समितीला अत्यंत बेजबाबदारपणे उत्तरे दिल्यामुळे सदरहू बाब गंभीर स्वरुपाची आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झालेले आहे. शासन निर्णयाचा नेमका अर्थ जाणून घेण्यासाठी प्रयत्न केला नाही. या संदर्भात रितसर चौकशी करुन समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा व दिलेल्या निदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी. तसेच या शासन निर्णयासंबंधी सचिवांच्या साक्षीमध्ये चर्चा करण्यात येईल असेही निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

मुख्यालयी राहत नसलेल्या ८९ शिक्षकांकडून घरभाडे रोखल्याची एकूण रु.२१,०२,९८१ वसूल केलेली रक्कम शासन खाती जमा करण्यात आली आहे काय? मा. न्यायालयाचा नेमका काय आदेश आहे. त्यानुसार शासनाने या संदर्भात ठोस कोणती कार्यवाही केली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) शिक्षण विभाग, प्राथमिक जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत मुख्यालयी राहत नसलेल्या ८९ शिक्षकांचा घरभाडे भत्ता वसूल केलेला नसुन रोखण्यात आला होता. संबंधितांचा रोखण्यात आलेला घरभाडे भत्ता त्यांना मिळणाऱ्या वेतन व भत्त्याच्या लेखाशिर्षाखाली शिल्लक ठेवण्यात आला होता. सदरची रक्कम संबंधितांना वेतनामध्ये अदा करण्यात आलेली नसल्याने वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच रिट याचिका क्र.५८२२/२०१४ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे कडील दिनांक १९ ऑक्टोबर २०१५ च्या निर्णयामध्ये वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक ५ फेब्रुवारी १९९० मध्ये ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहित केलेली शर्त काढून टाकण्यात येत आहे असे नमूद केले असल्यामुळे संबंधितांना घरभाडे भत्ता त्वरीत लागू करण्यात यावा असे आदेशित केले आहे. त्यावर ग्रामविकास विभाग यांचे कडील पत्र दिनांक २६ नोव्हेंबर २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबादच्या निर्णयानुसार आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करणेबाबत जिल्हा परिषदेला सूचित केले होते. त्यानुसार सदर बाबतीत या कार्यालयाने मुख्यालयी राहत नसलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता पुर्ववत सुरू करण्यात आला व संबंधितांचे खुलासा मान्य करून नियमित वेळेत व कार्यतत्पर राहून विना तक्रार कामकाज करावे याबाबत सक्त ताकीद देण्यात आली होती.

(२) दिनांक ७ ऑक्टोबर २०१६ **(परिशिष्ट क्र.८.१)** रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत एकूण ९०६ प्राथमिक शिक्षक मुख्यालयी राहत नसल्यामुळे त्यांचा घरभाडे भत्ता रोखण्यात आला आहे.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-**जिल्हा परिषदेने केलेली कारवाई योग्य आहे. मात्र सदर बाब ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**जिल्हा परिषद, धुळे यांनी केलेली कार्यवाही योग्य असून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार वित्त विभागाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत व ते स्वयंस्पष्ट आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ मे २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याचा मुद्दा शिक्षण विभागाशी संबंधित नाही. सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एका न्यायालयीन प्रकरणाचा निकाल वाचून दाखविला होता. तद् नंतर सचिव ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, शिक्षकांनी मुख्यालयी राहत नसल्याबाबत सन १९९० मध्ये वित्त विभागाने काढलेल्या शासन निर्णयामध्ये मुख्यालयी राहण्याच्या अटीचा समावेश नव्हता. जे शिक्षक मुख्यालयी राहत नव्हते त्यांचा घरभाडे भत्ता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बंद केला होता हे खरे आहे. त्यानंतर ते शिक्षक न्यायालयामध्ये गेले व त्यांनी तेथे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, सन १९९० च्या शासन निर्णयामध्ये अशी अट नाही. त्यानुसार ग्रामविकास विभागाने सन २०१५ मध्ये सांगितले होते की, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना घरभाडे भत्ता द्यावा लागेल. याबाबत समिती समवेत देखील चर्चा झाली होती. त्यानंतर ग्रामविकास विभागाने सन २०१६ मध्ये नवीन शासन निर्णय काढला व शिक्षकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले आहे. तसेच जर ते मुख्यालयी राहत नसतील त्यांना घरभाडे भत्ता मिळणार नाही, असे त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु सन १९९० ते सन २०१६ या कालावधीमध्ये मुख्यालयी राहणे बंधनकारक नव्हते व त्या आधारेच माननीय न्यायालयाने आदेश दिल्याने ग्रामविकास विभागाने घरभाडे भत्ता देण्याचे निर्देश दिले होते. आता शासन निर्णय काढून देखील जे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत त्यांच्यावर कारवाई करीत राहणे हा एकच पर्याय आहे असे समितीस विशद केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, धुळे येथे दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या दरम्यान दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील जिल्हा परिषद, धुळे यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन १९९० मध्ये वित्त विभागाने शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याबाबत काढलेल्या शासन निर्णयामध्ये मुख्यालयी राहण्याच्या अटीचा समावेश नव्हता. जे शिक्षक मुख्यालयी राहत नव्हते त्यांचा घरभाडे भत्ता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बंद केला होता. सन १९९० च्या शासन निर्णयामध्ये मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांचा घरभाडे भत्ता देऊ नये असे नमूद करण्यात आलेले नव्हते. या संबंधात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, जळगांव यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती त्यावेळी ही बाब मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. त्यावर दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित शिक्षकांना घरभाडे भत्ता देण्याबाबत आदेश झाले होते. त्यानुसार ग्रामविकास विभागाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला व मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा परामर्श घेऊन शिक्षकांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात आल्यामुळे जे शिक्षक मुख्यालयी राहत नसतील त्यांना घरभाडे भत्ता मिळणार नाही असे त्यामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, सन १९९० ते दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी मुख्यालयी राहणे बंधनकारक नव्हते.

**धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये मुख्यालयी राहत नसलेल्या ८९ शिक्षकांच्या घरभाडे भत्त्याची रोखण्यात आलेली एकूण रक्कम रुपये २१,०२,९८१/- एवढी आहे. तथापि, मा.न्यायालयाच्या निर्णयाचे व दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरण २०१६ पूर्वीचे असल्याने उपरोक्त शिक्षकांकडून घरभाडे भत्त्याची रक्कम रोखून ठेवता येईल किंवा कसे याबाबतचा तांत्रिकदृष्ट्या व नियमानुसार अवलोकन करुन ग्रामविकास विभागाने पुढील कारवाई करावी तसेच जे शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याचे आढळून येईल त्यांचा घरभाडे भत्ता अदा करण्यात येऊ नये तसेच सदरहू शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबत देण्यात येणा-या पुराव्यांबाबत देखील ग्रामविकास विभागाने निकष व नियम ठरवावेत, जेणेकरुन मुख्यालयी राहत असल्याबाबतच्या सत्यतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

## इंदिरा आवास योजनेबाबत

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेंतर्गत ४९७४ मंजूर घरकुलांपैकी ५५८ घरकुले अपूर्ण राहण्यामागची कारणे काय आहेत व सदरहू कामांची सद्यःस्थिती काय आहे, त्यासंदर्भात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे यांनी खुलासा केला की, अहवाल वर्षात ४९७४ घरकुलांची कामे मंजूर करण्यात आली व त्यापैकी २२२ घरकुले रद्द करण्यात आली. दुबार लाभ, दुबार नावे, लाभार्थी कायमस्वरुपी स्थलांतरित, लाभार्थी मयत पण वारस नाही इत्यादी कारणांमुळे घरकुले तात्पुरत्या स्वरुपात रद्द केलेली आहेत. प्रतिक्षा यादीतील पुढच्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. मागील वर्षी सन २०१६ मध्ये ७ हजार लाभार्थ्यांना लाभ दिलेला असून या वर्षी सन २०१७ मध्ये ६७०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट मंजूर झालेले आहे. त्यांचे खाते उघडणे वगैरे प्रक्रिया आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शबरी आवास योजनेची घरकुले मंजूर झाली आहेत काय, त्यासंदर्भात प्रकल्प संचालक यांनी खुलासा केला की, मागील वर्षात मंजूर झालेल्या घरकुलांची कामे सुरु आहेत. या वर्षी शासनाकडून उद्दिष्ट प्राप्त झाले नसल्यामुळे कामे घेण्यात आली नाहीत. शबरी आवास योजनेमध्ये १३०८ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १२१२ लाभार्थ्यांना पहिला हप्ता मंजूर केला आहे. आदिवासींसाठी शबरी आवास योजनेमध्ये लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले जातात त्यामध्ये लाभार्थ्यांना १ लाख २० हजार रुपये देण्यात येतात. लाभार्थी त्यांच्या ठेकेदारांकडून काम करुन घेतात. तसेच प्रत्येक विभागाची घरकुलाची योजना वेगळी असून राज्य स्तरावर एक एकक (युनिट) तयार केले आहे. सर्व कार्यक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत होणार आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, एक लाख रूपयांमध्ये किती चौरस फूट घर दिले जाते, घर देण्यासाठी निकष काय आहेत, लाभार्थ्याला घर न देता पैसे देण्यात आले आहे हे धुळे जिल्ह्यात झाले नसले तरी इतर जिल्ह्यांमध्ये झाले असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले. तद्नंतर प्रकल्प संचालक यांनी असे विदित केले की, पहिला हप्ता ३० हजार रूपयांचा, दुसरा हप्ता ६० हजार रूपयांचा आणि तिसरा ३० हजार रूपयांचा देण्यात येतो. पुण्यामध्ये घरकूल योजनेचे मोठे काम सुरू आहे. लाभार्थींनी पैसे घेतले पण घरकूल झालेले नाही असा मुद्या उपस्थित केला असता, त्यासंदर्भात अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, घरकुलाच्या कामासाठी विशेष कंत्राटी पद्धतीने अभियंता नेमले आहेत. या कामासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. आम्ही प्रत्येक घरकुलांचे जियो टॅगिंग केलेले असल्यामुळे नेट नसेल तर ऑफ लाईन त्या कामाचा फोटो काढून समाविष्ट करता येतो.

तद्नंतर प्रकल्प संचालक यांनी खुलासा केला की, काम पूर्ण करण्याचा कालावधी पूर्वी १८ महिन्यांचा होता तो आता १२ महिने करण्यात आला आहे, यावर समितीने असे मत व्यक्त केले की, १८ महिन्यात काम पूर्ण होणे आवश्यक असतांना आता ६० महिने झाले तरी सुद्धा काम पूर्ण झालेले नाही, सदरहू अपूर्ण अवस्थेच्या कामास कोण जबाबदार आहे याबाबतची माहिती समितीस सादर करावी.

तद्नंतर अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यासंदर्भात वेगवेगळ्या कारणांमुळे २२२ कामे रद्द करण्यात आली आहेत. तसेच अहवाल वर्षात इंदिरा आवास योजने अंतर्गत ४,९७४ घरकुले मंजूर करण्यात आली होती, यापैकी २२२ घरकुले विविध कारणांमुळे रद्द करण्यात आली आहेत. उर्वरित ४,७५२ घरकुलांपैकी ४,१९४ घरकुले पूर्ण करण्यात आली असून ५५८ घरकुले अपूर्ण आहेत. यापैकी २१३ घरकुलांमध्ये शौचालय बांधण्यात आलेले नाही म्हणून ती अपूर्ण दाखविण्यात आली आहेत. सदरहू २१३ घरकुलांमध्ये शौचालय बांधण्यात आले किंवा नाही याबाबतच्या सद्यःस्थितीचा अहवाल समितीस कळविण्यात यावा.

तद्नंतर प्रकल्प संचालक यांनी खुलासा केला की, जागेअभावी एक काम रखडलेले आहे. जोत्यापर्यंत बांधकाम झालेल्या कामाची संख्या ४५ आहे. भिंत पातळीपर्यंत बांधकाम झालेल्या कामाची संख्या ६८ आहे. त्यावेळी घरकुलांसाठी रूपये ६८,५००/- इतके अनुदान होते. सध्या रूपये १.२० लाख इतके अनुदान देण्यात येते.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, धुळे जिल्हा परिषदेला भेट देण्यासाठी तीन महिन्यांपूर्वीच समितीने पत्राद्वारे कळविलेले असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागवार आढावा घेतलेला दिसत नाही. यात अनेक त्रुटी असून कामकाजात सुध्दा कुचराई करण्यात आली आहे. तसेच अपूर्ण घरकुलांची कामे तीन महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात यावी. ज्यांच्यामुळे कामाला विलंब झाला आहे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी व सदरहू कामाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तत्परतेने अवगत करावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मा. पंतप्रधान महोदयांनी उज्वल गॅस योजना अंमलात आणली आहे. घरकूल पूर्ण होत असताना संबंधितांकडे गॅस नसेल तर गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याची तरतूद करता येईल काय ? कारण लाभार्थी स्वतः घर बांधत नाही. एवढेच नव्हे तर आर्थिक परिस्थितीमुळे घर देखील भाड्याने घेऊ शकत नाहीत. तरी त्यांच्या घरामध्ये गॅस येण्याची शक्यता आहे काय ? यावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी खुलासा केला की, मोफत गॅस पुरवठा योजना आहे. ज्या लोकांकडे घरकूल नाही त्यांच्याकडे गॅस असण्याचे कारण नाही. कारण ते स्वतः घर बांधत नाही. एवढेच नव्हे तर ते घर देखील भाड्याने घेऊ शकत नाही. सदरहू विषय सार्वजनिक महत्त्वाचा असल्याने विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येईल असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

(१) अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेअंतर्गत ४९७४ घरकूले मंजूर करण्यात आली असताना त्यापैकी २२२ घरकूले विविध कारणास्तव रद्द करण्यात आली, उर्वरित ५५८ अपुर्ण घरकुलांची सद्यःस्थिती काय आहे ?

(२) घरकुल पुर्ण होत असतांना लाभार्थ्यांकडे गॅस नसेल तर गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याची तरतुद करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१२-१३ या अहवाल वर्षातील घरकुलांची माहिती खालील प्रमाणे :—

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | रद्द केलेली | पुर्ण झालेली | अपूर्ण घरकुले | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४९७४ | २२२ | ४१९४ | ५५८ | |

इंदिरा आवास योजना सन २१०२-१३ अहवाल वर्षातील घरकुलांची सद्यःस्थिती खालील प्रमाणे :—

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | रद्द केलेली | पुर्ण झालेली | अपूर्ण घरकुले | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ५५८ | ११९ | ३६८ | ७१ | |

अहवाल वर्षातील ५५८ अपूर्ण घरकुले पूर्ण करणेसाठी लाभार्थ्यांचे ग्रामपंचायत स्तरावर मेळावे घेऊन ३६८ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे. सद्यः स्थितीत घरकुलांचे अनुदान रुपये १ लाख २० हजार आहे. सन २०१२-१३ मध्ये ६८,५००/- रु.अनुदान होते. त्यामुळे लाभार्थी घरकुलाचे बांधकाम करण्यास इच्छूक नसल्याने ११९ घरकुले रद्द करण्यात आली आहे. ७१ घरकुले किरकोळ कामाअभावी अपूर्ण आहेत. यासाठी लाभार्थ्यांना घरकुले तात्काळ पूर्ण करणे बाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. लाभार्थ्यांना मार्गदर्शन करुन सदर घरकुले पूर्ण करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) घरकुल पुर्ण होत असतांना लाभार्थ्यांकडे गॅस नसेल तर गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्याची तरतुद शासनाकडून करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(१) केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेच्या ३१ मार्च, २०११ च्या मार्गदर्शक तत्वातील परिच्छेद क्रमांक ५.१० मध्ये इंदिरा आवास योजनेच्या घरकुलाचे बांधकामास कोणत्याही परिस्थितीत २ वर्षापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही अशी तरतूद आहे.

५५८ घरकुलांपैकी लाभार्थी मृत (वारसा नसणे), स्थलांतरित होणे, लाभार्थी परागंदा असणे, वेळोवेळी पाठपुरावा करुन तसेच नोटीसी बजावून घरकुल बांधकामास लाभार्थी इच्छूक नसणे, शौचालयाचे बांधकाम अपूर्ण असणे इत्यादी कारणांस्तव ११९ घरकुले रद्द करण्यात आली आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (पूर्वीची इंदिरा आवास योजना) व अन्य राज्य पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावर राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कक्षाचे गठन करण्यात आले आहे. राज्य व्यवस्थापन, कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडून अपूर्ण घरकुलांबाबत वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार घरकुले पूर्ण करण्याची कार्यवाही केली जात आहे.

केंद्र शासन तसेच राज्य स्तरावरुन देखील अपूर्ण घरकुलांचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत असून अपूर्ण घरकुले युद्ध पातळीवर पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आहे. मा. मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव तसेच विभागाचे सचिव यांचेमार्फत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे अपूर्ण घरकुले पुर्ण करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावरील अधिका□ांकडे वेळोवेळी पाठपुरावा केला जातो.

(२) केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मागदर्शक तत्वानुसार केली जाते. सदरच्या मार्गदर्शक तत्वामध्ये घरकुल लाभार्थ्यांना गॅस कनेक्शन देण्याची कोणतीही तरतूद नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२□१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, इंदिरा आवास योजनेंतर्गत ४९७४ मंजूर घरकुलांपैकी ५५८ घरकुले अपूर्ण आहेत. अहवाल वर्षात ४९७४ कामे मंजूर करण्यात आली व त्यापैकी २२२ घरकुले रद्द करण्यात आली असून दुबार लाभ, दुबार नावे, लाभार्थी कायमस्वरुपी स्थलांतरित, लाभार्थी मयत झाले असून वारसा नसल्याने घरकुले तात्पुरत्या स्वरुपात रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पुढच्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे, परंतु मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील वारसास व गरीब लाभार्थ्यांना घरकुलांपासून वंचित ठेवणे उचित नसून आर्थिकदृष्टया कमकुवत असणा□ा, पक्के घर नसलेल्या आणि घरकुल योजनेचा कधीही लाभ घेतलेला नाही व घरकुलांचे निकष पूर्ण करणा□ा लाभार्थ्यांस राहण्याकरीता घरे बांधण्यात यावी असे समितीचे आग्रही मत आहे.

सदर योजनेंतर्गत घरकुल बांधण्यासाठी पूर्वी १८ महिन्यांचा कालावधी लागत होता. मात्र सध्या १२ महिने इतक्या कालावधीमध्ये घरकुल बांधून पूर्ण होणे आवश्यक आहे. **धुळे जिल्हा परिषदेअंतर्गत अहवाल वर्षात इंदिरा आवास योजनेमध्ये ४९७४ घरकुले मंजूर करण्यात आली होती त्यापैकी २२२ घरकुले विविध कारणांमुळे रद्द करण्यात आलेली असून उर्वरित ४७५२ घरकुलांपैकी ४१९४ घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. अद्याप ५५८ घरकुले अपूर्ण असून त्यामधील २१३ घरकुलांमध्ये शौचालय बांधण्यात आलेली नाहीत. उर्वरित ३४५ घरकुले अपूर्ण राहण्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच दारिद्रयरेषेखालील एकही कुटुंब घरापासून वंचित राहू नये यादृष्टीने शासन निर्णयानुसार प्राथम्यक्रमाने व टप्प्याटप्प्याने घरे देण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, धुळे (प्रशासन)

## एकात्मिक बालविकास योजना

समितीने दिनांक ५ ते ७ जुलै, २०१७ या कालावधीत धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, गंभीर स्वरूपाचे आजार व कुपोषित असलेल्या बालकांची संख्या फार मोठी असल्याने यासंबंधी कोणती उपाययोजना केली आहे, यावर प्रभारी महिला व बालकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, गंभीर स्वरूपाचे आजार असलेल्या रुग्णांना संदर्भ सेवा देण्यात येते. कुपोषित बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र चालविण्यात येत होते त्यात एक महिनाभर कुपोषित बालकांना अंगणवाडीमध्येच पोषण आहार देण्यात येतो. सन २०१२-१३ मध्ये मध्यम गंभीर कुपोषित बालकांची संख्या २४०५ होती, तर तीव्र गंभीर कुपोषित बालकांची संख्या ३३५ होती. या कुपोषित बालकांच्या प्रकृतीमध्ये उपचारानंतर एक-दोन महिन्यांमध्ये सुधारणा होते, त्यामुळे दर महिन्यांमध्ये कुपोषित बालकांचा आकडा हा कमी अधिक होत असतो. ३३५ कुपोषित बालकांपैकी २३३ बालकांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मध्यम व तीव्र गंभीर याबाबतची व्याख्या काय आहे, त्याबाबत प्रभारी महिला व बालकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, अंगणवाडीमध्ये मुलांचे वजन घेतले जाते. तेथे बालकांसाठी आलेख असतो. त्यावर त्यांचे वय व वजन इत्यादीची सर्व नोंद हिरवा, पिवळा, लाल रंगाच्या भागामध्ये केली जाते. त्यावरून सिव्हीअर ॲक्युट मॉलन्युट्रीशन, SAM मॉडरेट ॲक्युट मॉलन्युट्रीशन (MAM)ठरविले जाते. पूर्वी पाच ग्रेड होत्या. त्या आता ग्रेड SAM, MAM, नॉर्मल अशा प्रकारच्या तीन ग्रेड केलेल्या आहेत. सॅम आणि मॅम हा प्रकार आरोग्य विभागामार्फत ठरविण्यात येतो. यावर प्रभारी महिला व बालकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, गंभीर स्वरूपाचे आजार म्हणजे हृदयाला छिद्र असणे यासह वेगवेगळ्या ५/६ प्रकारचे आजार असून सिकलसेलचा देखील यात समावेश आहे. यासाठी स्वतंत्र सेल देखील आहे. स्तनदा माता व गरोदर स्त्रिया यांना मानव विकास अभियान अंतर्गत महिन्यातून दोन वेळा मार्गदर्शन शिबीर घेण्यात येते. चार हजार रूपये एका मातेला दिले जातात. तेवढी त्यांना मदत करण्यात येते. सन २०११-२०१२ मध्ये ५९९५ स्तनदा माता होत्या. धुळे जिल्ह्यामध्ये १४ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येते. या योजने अंतर्गत अति जोखमीच्या महिलांना रूपये ४०० प्रतिमाह औषधांसाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते.

तद्नंतर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी विदित केले की, साक्री येथे एका आदिवासी पाड्यात प्राथमिक आरोग्य केंद्र बांधले आहे. सरकारी जागेवर घरे बांधलेली आहेत. सरकारी पैशाने खाजगी जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधली असून जागेचा मालक ती जागा आता वापरण्यास मनाई करीत आहे, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्र हे १० ते १२ वर्षापूर्वीचे आहे. १२ वर्षापूर्वी खाजगी जमिनीवर प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात आले असून जागेचा मालक ही इमारत जिल्हा परिषदेच्या ताब्यात देत नाही. जागेच्या मालकाला जागेची किंमत म्हणून ८.८० लक्ष रुपये देण्याचा प्रयत्न सुरु होता. सेस फंडातून ५ लक्ष रुपये देण्याची तयारी केली आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, डोंगराळ व दुर्गम भागातील दुर्बल आदिवासी माता-भगिनींना आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यापूर्वी जागेची शहानिशा न करता इमारत उभारणी केल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यात यावी.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सिकलसेल हा आजार नसला तरी सिकलसेलमुळे गुडघा व कंबरेची हाडे ठिसूळ होतात व त्यासाठी ३ ते ५ लक्ष रुपये खर्च येतो. हृदयरोग व मूत्रपिंड रोपणासाठी शासनाकडून मोफत उपचार मिळतो परंतु सिकलसेलसाठी शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे सिकलसेलचा समावेश गंभीर आजारात करण्याची आवश्यकता आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सौर परिवर्तक (सोलर इनर्व्हटर) ची काय परिस्थिती आहे, याबाबत ३७ सोलर इनर्व्हटर पैकी ४ युनिट सुरु आहेत असे प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस माहिती दिली. बेटावद तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सन २०११-२०१२ मध्ये ८ सोलर इनर्व्हटर देण्यात आले होते. सदर सौर परिवर्तक (सोलर इनर्व्हटर) ८-९ महिन्यानंतर बंद अवस्थेत आहेत. सौर परिवर्तक (सोलर इनर्व्हटर) मध्ये बॅटरीची ५ वर्षाची हमी असून सोलर पॅनलची १० वर्षाची हमी आहे. हमीचा कालावधी संपलेला नसतांना आणि योजनेचा उद्देश सफल झालेला नाही या कारणास्तव समितीने असमाधान व्यक्त केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात कंपनीने पास केलेली औषधे खराब असल्याने त्यास कोण जबाबदार आहे ? सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भांडारात Tab. Mesoprostol 200 mg अप्रमाणित घोषित करण्यात आल्याने सदर औषधाचा वापर पुढील आदेश होईपर्यंत थांबविण्यात आला होता, त्याबाबत प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी औषधे आल्यानंतर नमुने तपासून व जी औषधे योग्य असतात ती वापरली जातात. खराब आलेले नमूने बाजूला ठेवण्यात आले होते व हे औषध वापरले जाणार नाही याची काळजी घेण्यात आली होती. अयोग्य व निकृष्ट प्रतीची औषधे प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर पत्र व्यवहार करणे आवश्यक होते, मुद्दा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागविली :—**

(१) गंभीर स्वरुपाचे आजार व कुपोषित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्याने यासंबंधी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या ?

(२) साक्री व्यतिरिक्त आणखी आदिवासी पाड्यावरील कुपोषित बालकांना योग्य व वेळेत उपचार घेण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवा पुरविण्यासाठी काय कार्यवाही /उपाययोजना केली आहे ?

(३) बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवठा करण्यात आलेली औषधे निकृष्ट दर्जाची असल्याने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) आरोग्य विभागामार्फत सन २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीत गंभीर आजारी बालकांपैकी ६७२ बालकांच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ मधील गंभीर आजारांपैकी हृदयशस्त्रक्रिया केलेल्या बालकांची आकडेवारी.

| Awc & school | Identified for heart sugeries (after 2nd echo) | Heart surgereis conducted | Reasons for Heart surgeries Not Conducted | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Not Willing | Follow up | No. Need | for medicine | personaly by done | can't operate | other reasons | Mirg ated | Total |
| 1278 | 672 | 85 | 193 | 241 | 19 | 32 | 6 | 3 | 27 | 606 |

जिल्ह्यातील एकुण ४१ प्राथमिक आरोग्य केंद्र व २३२ उपकेंद्रे आहेत. त्यापैकी आदिवासी क्षेत्रात १४ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना व कार्यवाही करण्यात येत आहे.

(१) नवसंजीवनी योजना-अ-मातृत्व अनुदान-आदिवासी भागातील गरोदर मातांना रु.४००/- व रोख रु.४००/-चे औषधे देण्यात येते.

(२) मानव विकास योजना-मानव विकास कार्यक्रमांतर्गत गरोदर माता, स्तनदा माता व ० ते १ वर्षाच्या वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी तसेच ३ व ४ ग्रेडच्या कुपोषित बालकांची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व औषधोपचार व संदर्भ सेवा देण्यात येते.

**३) कुपोषण :-**

(अ) आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत दर ६ महिन्यांनी तपासणी करण्यात येऊन संदर्भ सेवा व औषधोपचार करण्यात येत आहे.

(ब) आदिवासी भागातील कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत दर तीन महिन्यांनी सर्व अंगणवाड्यातील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन संदर्भ सेवा व औषधोपचार देण्यात येत आहे.

(क) आदिवासी भागात गाव पातळीवर ग्राम बालविकास केंद्र (व्हीसीडीसी) मार्फत कुपोषित मुलांना दाखल करून त्यांना आहार आणि औषधोपचार व तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येत आहे.

**(४) लसीकरण :-**आदिवासी अतिदुर्गम भागात इंद्रधनुष्य कार्यक्रमांमार्फत लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचे लसीकरण पुर्ण करण्यात येते.

**(५) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम** (जेएसएसके) राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविण्यात येत असुन त्या अंतर्गत गरोदर मातांना व ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत औषधोपचार व वाहन व्यवस्था करण्यात येत आहे.

**(६) जननी सुरक्षा योजना :-** या योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील व अनुसूचित जाती व जमातीतील गरोदर मातांना औषधोपचारासाठी रु.७०० देण्यात येत आहे.

**(७) न्युट्रीशन रिहायब्लेकेशन सेंटर (एनआरसी) :-** शिरपूर येथे उप जिल्हा रुग्णालयात कुपोषित मुलांना आहार व उपचार देण्यात येतो.

**(८) चाईल्ड ट्रिटमेंट सेंटर (सीटीसी) :-** साक्री ग्रामीण रुग्णालयात कुपोषित बालकांसाठी आहार व उपचार केला जातो.

**भरारी पथक :-**

आदिवासी क्षेत्रातील बालकांचे व मातांचे तसेच इतर रुग्णांचे सर्वेक्षण करून औषधोपचार करण्यासाठी मानवसेवी वैद्यकीय अधिकारी, बी.ए.एम.एस. डॉक्टरांची १ एप्रिल ते ३१ मार्च कालावधीत अतिदुर्गम भागात तालुका निहाय नियुक्ती केली जाते.

साक्री व शिरपूर तालुक्यात प्रत्येकी ८ भरारी पथके यावर्षी सुद्धा १६ डॉक्टरांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. गरोदर महिला व स्तनदा माता व ग्रेड ३ व ग्रेड ४ मधील कुपोषित बालकांना औषधोपचार करण्यासाठी औषधे पुरविण्यात येतात. प्रत्येक भरारी पथकाला वाहनाची सुविधा पुरविण्यात आलेली आहे. विशेषतः माता व बालकांची तपासणी केली जाते व गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना संदर्भित केले जाते.

मानव विकास कार्यक्रम अंतर्गत धुळे जिल्ह्यात एकुण ४१ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून प्रत्येक केंद्रात दरमहा दोन आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येतात. त्यात स्त्रीरोग तज्ञ व बाल रोगतज्ञ डॉक्टरांकडून गरोदर माता, स्तनदा माता व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी व औषधोपचार केले जातात. सदर कार्यक्रम सन २०१२-१३ पासून आजपर्यंत सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आवश्यक त्या प्रयोगशाळेत चाचण्या करून औषधोपचार केले जातात.

सन २०१२-१३ कुपोषण निर्मुलनासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | उपाययोजना | संख्या | दाखल बालके | सुधारणा झालेली बालके | सुधारणा झालेल्या बालकांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १) | V.C.D.C | ४९३ | १४७४ | १०६६ | ७२.३२% |
| २) | C.T.C | ४ | ३६ | १६ | ४४.४४% |
| | एकूण | ४९७ | १५१० | १०८२ | ७१.६५% |

१) कुपोषण निर्मुलनासाठी आदिवासी उपयोजनेतून व जिल्हा परिषद सेस फंडातून, मायक्रोन्युट्रियन सिरप व प्रोटीन फुड सप्लिमेंट वाटप करण्यात आलेली आहे.

२) माहे एप्रिल, २०१६ पासून भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-२ अन्वये, अनुसूचित क्षेत्रातील ६४२ अंगणवाड्यांमध्ये ७ महिने व ६ वर्षे बालकांसाठी महिन्यातील १६ दिवस अंडी/केळी वाटप करण्यात येते.

३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे स्तरावरुन Tab Mesoprostol 200 mg च्या खरेदीसाठी ई निविदा काढण्यात आली व खरेदी समितीच्या मान्यतेनंतर राज्य स्तरावरील राज्यातील सर्व आरोग्य संस्थांसाठी पुरवठा आदेश संचालनालयाच्या दिनांक २३ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आला. या पुरवठा झालेल्या औषधाचे नमुने मागविण्यात आले व

NABL संस्थेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले व नमुने वापरणे योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर ही औषधे संस्थांना वापरण्यास परवानगी देण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाकडून वर्धा विभागामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा येथुन Mesoprostol Tab 200 mg च्या Batch No T-१५०००००१ चा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला व अन्न औषध प्रशासनाच्या तपासणीच्या अंती सदर Batch चा साठा वापरण्यास अयोग्य/अप्रमाणित असल्याने त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २९ एप्रिल, २०१७ नुसार कळविले.

त्यानुसार Mesoprostol Tab २०० mg Batch No T-१५०००००१ चा वापर तत्काळ थांबविण्याबाबत सर्व आरोग्य संस्थांना या कार्यालयाचे पत्र दिनांक ११ मे, २०१७ नुसार कळविण्यात आले.

तसेच पुरवठादार कंपनीला सर्व आरोग्य संस्थांमध्ये या Batch No. च्या जेवढ्या गोळ्या शिल्लक आहेत, त्या परत घेवुन तेवढ्या गोळ्यांचा पुर्नपुरवठा करण्याबाबतच्या सुचना या संचालनालयाचे पत्र दिनांक ११ मे, २०१७ अन्वये देण्यात आले. त्यानुसार सदर पुरवठादार कंपनीने राज्यातील आरोग्य संस्थांना शिल्लक साठ्या एवढ्या गोळांचा पुर्नपुरवठा केला आहे.
या गोळ्यांपैकी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचा तपशील असा आहे.

जिल्हा परिषद, धुळे यांना प्राप्त गोळ्या २०१२९ पैकी प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाटप झालेल्या गोळ्या १४०५०, जिल्हा भांडारात शिल्लक गोळ्या ६०७९, प्राथमिक आरोग्य केंद्रांना वाटप झालेल्या गोळ्यांमधुन रुग्णांना वाटप झालेल्या गोळ्या ११९३० यापैकी ११९३० (+) मुळ भंडारातील शिल्लक गोळ्या ६०७९ अशा एकुण १८००९ गोळ्या पुरवठादार कंपनीला परत करण्यात आल्या व तेवढ्याच गोळ्या दिनांक ५/९/२०१७ रोजी कंपनीने जिल्हा परिषद, धुळे यांना पुनर्पुरवठा केला.

ज्या Mesoprostol Tab 200 mg २१२० गोळ्यांचे वाटप रुग्णांना झाले होते, त्या गोळ्यांपासून रुग्णांना त्रास झाल्याची कोणतीही तक्रार जिल्हा परिषद, धुळे यांचेकडे प्राप्त झालेली नाही. तसेच कंपनीचे अप्रमाणित गोळ्या परत घेवून पुनर्पुरवठा केलेल्या गोळ्या सद्यःस्थितीत रुग्णांसाठी वापरण्यात येत आहे.
सदर तपासणी करुन औषध अप्रमाणित करावयाची कारवाई अन्न व औषध प्रशासनाने केल्यामुळे या अप्रमाणित औषधाबाबत कंपनीविरुद्ध करण्याची कार्यवाही अन्न व औषध विभागाकडून होणे अपेक्षित आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**१) महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, धुळे यांचे उत्तराशी शासन सहमत आहे.

**२) व ३) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** अप्राप्त

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ व १६ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, गंभीर स्वरूपाचे आजार व कुपोषित असलेल्या लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्याने यासंबंधी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच गंभीर स्वरूपाच्या आजाराचा व कुपोषणाचा विषय असून त्या संबंधातील अभिप्राय अप्राप्त असण्याचे कारण काय आहे, त्यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, कुपोषणाचा विषय हा महिला व बाल विकास विभागाशी संबंधित आहे. जिल्हा परिषद, धुळे यांच्या उत्तराशी शासन सहमत आहे. तसेच गंभीर आजारासंबंधातील माहिती देण्यात आली आहे असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विशद केले असता माहिती अप्राप्त असे लिहिण्याचे कारण काय आहे याबाबतचा खुलासा तात्काळ करण्यात यावा असे निदेश समिती दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात निकृष्ट दर्जाचा औषध पुरवठा करण्यात आला आहे, त्याबाबत आपण कोणती कारवाई केली आहे यात देखील अभिप्राय अप्राप्त असल्याचे नमूद केलेले आहे. सदर तपासणी करून औषध अप्रमाणित करावयाची कारवाई अन्न व औषध प्रशासनाने केल्यामुळे या अप्रमाणित औषधाबाबत कंपनीविरूद्ध करण्याची कार्यवाही अन्न व औषध विभागाकडून होणे अपेक्षित आहे असे पृष्ठ क्रमांक ३४ वर नमूद करण्यात आलेले आहे त्याबाबत आपल्याकडून पाठपुरावा झालेला आहे काय,

त्यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, हा विषय असा आहे की, Mesoprostol या गोळीचा पुरवठा आदेश टेंडर प्रक्रिया पूर्ण करून माहे जून, २०१६ मध्ये दिला होता. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने काही नमूने तपासणीसाठी घेतले.

सार्वजनिक आरोग्य विभागाने पुरवठा आदेश देण्यापूर्वी GMP चे प्रमाणपत्र, प्रयोगशाळा चाचणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात येते. औषध प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक गटातील एक नमुना मुक्तपणे काढून घेतला जातो. त्यानंतर ज्या सहा प्रयोगशाळा आहेत, त्यांच्याकडे तपासणीसाठी पाठवून देण्यात येते. जो पर्यंत त्यांचा अहवाल प्राप्त होत नाही तो पर्यंत त्या औषधांचे वितरण रूग्णांना करण्यात येत नाही. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर औषधांचा पुरवठा करण्यात आला. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने नमुने घेतले व ते निष्क्रीय ठरल्याने पुरवठा थांबविण्यात आला या उत्तरानंतर समितीने विचारणा केली की, सुरूवातीला औषध प्रमाणित केले नव्हते ?

त्यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, सुरूवातीला औषध तपासले होते. विशिष्ट गटातील नमुना वितरीत करताना प्रयोगशाळेतील तपासणीनंतरच वितरीत केला जातो. त्यासंदर्भातील अहवाल आहे. अनेकदा साठ्यामध्ये अडचण असू शकते. तापमानामुळे बदल होऊ शकतो. १०% औषधांवर व्यवस्थित साठवणूक न केल्यामुळे परिणाम होतो. त्यावेळी नेमके काय कारण होते हे माहित नाही. पुरवठा करण्यापूर्वी विभागाकडे नमुना संमत झाल्याचे प्रमाणपत्र होते. पुरवठा केल्यानंतर देखील जो नमुना तपासण्यात येतो तो मान्य होतो पण अन्न व औषध प्रशासनाने एका गटाचे नमुने काढले तेव्हा ते मान्य झाले नाही. त्यामुळे आपण सर्व गोळ्या एकत्र केल्या आणि कंपनीकडून दुसरा पुरवठा प्राप्त करून घेतला. सुरूवातीला फार कमी प्रमाणात गोळ्यांचे वितरण करण्यात आले होते. एकूण ७ लाख ६२ हजार २८९ टॅबलेटस् होत्या. त्यापैकी ६ लाख ८ हजार ६४४ आपल्याकडे शिल्लक असलेल्या गोळया कंपनीला परत करून कंपनीकडून नवीन औषधे प्राप्त करून घेतली आहेत. कंपनी विरूद्धच्या कारवाईचा अधिकार हा अन्न व औषध प्रशासन यांना आहे. अन्न व औषध प्रशासनाने नमुने काढल्यामुळे आणि ते निष्क्रीय ठरल्याने तसे त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाला देखील कळविले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, चुकीचे औषध पुरविण्याचे काम कंपनीकडून झालेले असल्याने त्या कंपनीविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने त्याबाबत संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे, त्यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी हा विषय अन्न व औषध प्रशासनाच्या अंतर्गत येत असल्याने तो सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित नाही असे समितीस अवगत केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सार्वजनिक आरोग्य विभागाने औषधांचा पुरवठा स्वीकारला असल्याने त्या कंपनीविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे याची माहिती साक्षीच्या वेळी घेऊन येणे आवश्यक होते. सार्वजनिक आरोग्य विभागाने त्या विभागाकडून ती माहिती प्राप्त करून घ्यावयास पाहिजे होती. तो पुरवठा त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाला केलेला आहे. अशा प्रसंगी वाईट घटना घडली असती तर त्यास कोण जबाबदार राहिले असते. या संदर्भात कारवाई करण्यासाठी आपण कोणता पत्र व्यवहार केला आहे, त्याबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, कंपनीला माहे मे, २०१७ मध्ये कळविले होते की, त्या त्या तुकडीतील मुदतबाह्य दिनांक आणि निर्मिती दिनांक असा असून पुनर्पुरवठा करून नवीन तुकडीतील औषधे पाठवावीत तशी अट टेंडरमध्ये होती. जेव्हा पुरवठा आदेश दिला तेव्हा त्यांच्याकडे मान्यता प्रमाणपत्र होते. एवढेच नव्हे तर मुक्तपणे नमुने (रॅंडम सॅम्पल) काढले तेव्हा ते देखील मान्य झाले होते.

समितीने असे निदेश दिले की, सदर तपासणी करून औषध अप्रमाणित करावयाची कारवाई अन्न व औषध प्रशासनाने केल्यामुळे या अप्रमाणित औषधाबाबत कंपनीविरूद्ध करण्याची कार्यवाही अन्न व औषधीद्रव्ये विभागाकडून होणे अपेक्षित असल्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सचिवांना साक्षीसाठी बोलवावे. तसेच त्यांनी अप्रमाणित झालेल्या औषधांचा पुरवठा करायला नको होता. त्या पुरवठादाराने कागदोपत्री औषध प्रमाणित आहे असे दाखविले आहे. त्या गोळ्या यापूर्वीच अप्रमाणित केल्या होत्या काय, चुकीच्या औषधामुळे राज्यभर फार मोठा अनुचित प्रकार घडला असता. त्यामुळे त्या कंपनीने अशा प्रकारच्या गोळ्या का तयार केल्या आहेत ? त्या कंपनीवर आपण कारवाई करावयास पाहिजे होती,

तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, संपूर्ण देशाची आकडेवारी पाहिली तर असे दिसून येईल की, १० ते २० टक्के औषधे एकदा पुरवठा झाल्यानंतर त्याचे नमुने घेतले तर ते नापास होण्याची शक्यता असते. आता भारत सरकार सुध्दा साठवण पध्दतीची काळजी घेते. याचा अर्थ असा नाही की, पुरवठा होण्यापूर्वी औषध नापास होते. पुरवठा होण्यापूर्वी ते पास होते. त्याचे प्रमाणपत्र सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आहे. त्यानंतर ते संबंधित प्रयोगशाळेमध्ये तपासून घेतले आहे. त्या प्रयोगशाळेने देखील पास प्रमाणपत्र दिल्यामुळेच आम्ही वितरणाची परवानगी दिली. कंपनीने जो पर्यंत आम्हाला पुनर्पुरवठा केला नाही तो पर्यंत आपण त्यांना देयक अदा केले नव्हते. त्या कंपनीने पुन्हा औषधाचा पुरवठा केलेला असल्यामुळे देयक झालेले आहे. शासनाचे काहीच नुकसान झालेले नाही. सहा लाख गोळ्या परत केल्या व त्या बदल्यात त्यांच्याकडून नवीन गोळ्या घेतल्या आहेत.

निकृष्ट दर्जाचा मालाचा पुरवठा केल्यानंतर देयके अदा करण्यात आल्याने त्या कंपनीवर कोणती कारवाई झाली हे देखील सांगू शकत नाहीत त्यामुळे समितीचे समाधान झाले नाही. अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासणी केली म्हणून त्यांनी कारवाई करावी असे प्रधान सचिव, सार्वजनिक

आरोग्य विभागाचे म्हणणे असल्याने यासंदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाने यांनी कोणती कारवाई केली हे जाणून घेण्यासाठी दोन्ही विभागाच्या सचिवांना साक्षीसाठी बोलविण्यात यावे. अयोग्य गोळ्या वितरणाचा तपासणी करण्याचा अधिकार अन्न व औषध प्रशासन विभाग यांना असल्याने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस कळविण्यात यावा व योग्य तापमानामध्ये गोळ्या ठेवल्या नाहीत म्हणून त्या खराब झाल्या. तसेच या औषधांचा पुरवठा राज्यातील कोणकोणत्या ठिकाणी करण्यात आला आहे याची तपशीलवार माहिती देण्यात यावी, असे समितीने निदेशित केले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली होती. त्यावेळी बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवठा करण्यात आलेली औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आले होते. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात निकृष्ट व बोगस औषधे सापडली होती तत्संदर्भात चौकशी करण्यात यावी. अन्न व औषध प्रशासनाकडून वर्धा विभागामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा, येथून मेसोप्रोस्टोल टॅब २०० एमजी, बॅच नंबर टी-१५००००१ चा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला आणि अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणी अंती सदर बॅचचा साठा वापरण्यास अयोग्य किंवा अप्रमाणित असल्याने त्यांच्या कार्यालयाने दिनांक २९.४.२०१७ नुसार कळविले. मात्र त्यानंतर ही औषधे परत घेतली आहेत आणि त्याच कंपनीकडून दुसरी औषधे घेऊन वितरित केली आहेत. तसेच औषधे निकृष्ट दर्जाची असताना परत कशी घेतली.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विदित केले की, सार्वजनिक आरोग्य विभागाने आपण निविदा प्रक्रिया राबविली होती. ते हॉर्मोनल कम्पाऊंड आहे. हार्मोनल कम्पाऊंडची २०० एमजीची गोळी होती. दिनांक २३ जून, २०१६ रोजी ७ लाख ६५ हजार गोळ्यांची मागणी केली होती, त्यापैकी ७ लाख ६२ हजार गोळ्यांचा पुरवठा झाला होता. अशी पध्दत आहे की, पुरवठा झाल्यानंतर प्रत्येक गटाचे नमुने काढतो. उत्पादकानेही पुरवठा करण्यापूर्वी एक अहवाल देणे अपेक्षित आहे की, काढलेल्या नमुन्यांमध्ये किती मात्रा निघालेली आहे. जे नमुने उत्पादकांच्या स्तरावर काढण्यात आले, त्यामधील तो नमुना पास होता. देवांश टेस्टिंग रिसर्च लॅबोरेटरी येथे नमुना काढला, त्यामध्ये क्वॉंटिटी १९४ एमजी म्हणून पास आहे. उत्पादन माहे ऑगस्ट, २०१६ रोजीचे आहे. त्यावेळी ते औषध गुजरात येथील सेंच्युरियन नावाच्या कंपनीने बनविले आहे. माहे जुलै पासून डिसेंबर पर्यंत पुरवठा होण्यास सुरुवात झाली. मात्र ७-८ महिन्यांनंतर माहे एप्रिल-मे, २०१७ पर्यंत वर्धा येथे या औषधाच्या एका बॅचचे सॅम्पल काढण्यात आले असता त्यामध्ये १०५ एमजी अशी मात्रा आढळली असे एफडीएने जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांना पत्र दिले आहे, त्या अनुषंगाने त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सांगितले आहे. आपण दिनांक ११ मे, २०१७ रोजी देयक कालावधीमध्ये राज्यभरात जेथे कुठे या औषधाचा साठा उपलब्ध होता, त्याचा वापर करू नये असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आणि कंपनीलाही त्याबाबत तसे सांगितले आहे त्यावेळी राज्यभरात पुरवठा झाला होता ते परत घेतले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, तुमचा त्या आधी राज्यभरात पुरवठा झाला असेल, त्याबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, १ लाख ५४ हजार गोळ्या वापरण्यात आल्या होत्या. मात्र त्याचा कोणताही वाईट परिणाम झाल्याचे आढळून आलेले नाही.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी काही तांत्रिक बाबी समितीच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यामध्ये नमुन्याचे ४ प्रकार असतात. नॉट ऑफ स्टँडर्ड क्वॉलिटी, ॲडल्टरेशन, स्पुरिअस व मिसब्रँडेड असे ते प्रकार असतात. काढलेल्या नमुन्याच्या निकालाचे अशा प्रकारचे वर्गीकरण करु शकतो. अनस्टेबल कम्पाऊंड आहेत जे सारखे वाढू शकतात. स्टोरेज, ट्रान्सपोर्टेशन महत्त्वाचे असते, तापमान ३० अंशांपेक्षा जास्त गेले तर त्याचे विघटन सुरू होते. त्यामुळे त्याचे २०० एमजी असलेले कम्पाऊंड कमी येण्याची शक्यता असते. वर्ध्यामध्ये तापमान जास्त आहे. १ वर्षानंतर काढलेला नमुना आहे. तेथे कम्पाऊंड १०५ एमजी आढळले तर याचा अर्थ असा नाही की, ते निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामध्ये तांत्रिक व्याख्या आहेत तसेच त्या गोळ्या कमी परिणाम कारक (Less Effiective) होऊ शकतात. केंद्र सरकारचाही अहवाल आहे. साठवण व्यवस्था कशी आहे ते पाहिले जाते. १५ ते २० टक्केच नमुने असे होतात. देशामध्ये महाराष्ट्र राज्य फार चांगले म्हणून ओळखले जाते. राज्यात दरवर्षी ७०० ते ८०० नमुने सार्वजनिक आरोग्य विभाग स्वतःच्या स्तरावर काढतो. सन २०१६-१७ मध्ये एकही नमुना नापास झालेला नाही. सन २०१७-१८ मध्ये नमुने काढले होते, त्यामध्ये जी मात्रा पाहिजे होती तेवढी नव्हती. सन २०१५-१६ मध्ये ६ संदर्भात माहिती आहे. आपली यंत्रणा सक्षम आहे. हे विशिष्ट संयुग आहे. असे विशिष्ट स्थिर संयुगामध्ये घडणार नाही. हे संप्रेरक संयुग आहे, ते अस्थिर आहे. त्यासाठी ३० अंशांपेक्षा जास्त तापमान व्हायला नको. त्याची मात्रा २०० एमजी ऐवजी १०५ एमजी आली आहे. वर्धाच्या एकाच ठिकाणी असे घडले आहे, असे सांगता येणार नाही. कारण त्यांनी एकच नमुना काढला. जेथे होते तेथील सर्व वापर थांबविला आहे. गोळ्या पुरवठादाराला दिल्या आहेत. उत्पादक गुजरातचा असल्यामुळे गुजरातच्या अन्न व औषध प्रशासनाला सांगितले, गुजरातच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने त्या उत्पादकावर कारवाई केली आहे. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा वस्तुनिष्ठ अहवाल समितीस सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संपूर्ण महाराष्ट्रात औषधांचा नमुना पास होतो. फक्त एकाच जिल्ह्यात ते औषध योग्य नव्हते काय, यासंदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, एकाच तुकडीचे मुक्तपणे नमुने घेतले जातात. राज्यात एकच तुकडी होती. संपूर्ण राज्यात एकाच तुकडीमधील एकाच ठिकाणी नमुने होते. एका तुकडीच्या गोळ्या १०-२० लाख असतील, एकूण ६ प्रयोगशाळा आहेत. वर्ध्याचे नमुने अन्न व औषध प्रशासनाने काढले आहे, जे आमच्याकडे १९४ एमजी आहे. आमच्याकडे ७-८ महिन्यांनंतर यांनी एके ठिकाणी शासकीय प्रयोगशाळेत नमुने काढले. त्याची मात्रा १०५ एमजी आहे. संचालक, आरोग्य सेवा यांनी विदित केले की, त्या औषधाला खराब म्हणता येणार नाही. ते औषध सप्रेरक आहे. साठवण व्यवस्था चांगली असली पाहिजे. ते खूप व्यवस्थित राहायला लागते, म्हणजेच ३० अंशांपेक्षा कमी तापमानात ते असले पाहिजे तरच त्याची क्षमता तेवढी राहते. ते औषधाच्या लेबलवरच लिहिलेले असते. तापमान कमी-जास्त झाले तर त्याची क्षमतेवर परिणाम होतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, धुळे जिल्हा परिषदेने लिहून दिले आहे की, सदर तपासणी करून औषध अप्रमाणित करण्याची कार्यवाही अन्न व औषध प्रशासनाने केल्यामुळे, अप्रमाणित औषधाबाबत कंपनीविरुध्द अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे. औषध पुरवठा करण्याचा मागणी आदेश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिला आहे. नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाने काढले आहे. कमी परिणामकारक किंवा कमी दर्जाचे आहे, हे त्यांना कळविले आहे. त्यामुळे कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाकडून झाली पाहिजे, त्यासंदर्भात कायद्यामध्ये तशीच तरतूद आहे. उत्पादक गुजरातचा आहे. त्यांनी ते अन्न व औषध प्रशासन विभाग गुजरातला दिले आहे. कंपनीचे लायसन्स रद्द करण्याच्या संदर्भातील कारवाई करण्याच्या संदर्भात गुजरात अन्न व औषध प्रशासन विभागाला अधिकार आहेत. तसेच दिनांक २० मार्च, २०१७ ला यासंदर्भात त्यांना कळविले आहे. याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले. तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, उत्पादकाकडील पूर्ण फॅक्टरीतील उत्पादनाचे असलेले लायसन्स १ दिवसासाठी निलंबित केले आहे, त्या उत्पादकाला एका दिवसासाठी कोणतेही औषध उत्पादित करता येणार नाही. मालाचा पुरवठा पाहून सदरहू कारवाई करणे अपेक्षित आहे.

समितीच्या मते सदरहू मुद्दा जनतेच्या आरोग्याशी व जीवनाशी संबंधित असून त्यांच्या जीवनाशी खेळणारा मुद्दा आहे. दुष्परीणाम झाला असता तर खूप वाईट घडले असते, काही झाले नाही म्हणून ठीक आहे. परिणाम वेगळ्या पध्दतीने झाला असता, दुष्परिणाम झाला असता तर काही लोक मरण पावले असते. प्रश्न एक दिवसासाठी परवाना निलंबित करण्याचा नसून फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा.

तद्नंतर समितीला अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तांनी माहिती दिली की, सदरहू औषध युटराईन कॉन्ट्रॅक्शनचे औषध आहे. बाळंतपणानंतर रक्तस्त्राव थांबविण्यासाठी ते औषध आहे. सदरहू औषध साधे नसून संवेदनशिल व अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे पोटामधील अल्सर ठीक करता येतात. युटराईन कॉन्ट्रॅक्शन व्यवस्थित नसते त्यावेळेस हे औषध दिले जाते असे समितीस माहिती दिली. तसेच अतिरिक्त अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान) यांनी विदित केले की, भेसळ असेल तर काही तरी दुष्परिणाम होतात. आपल्या निविदेमध्येच काळ्या यादीत टाकण्याची तरतूद आहे. कमी दर्जाचे होण्यामध्ये इतरही गोष्टी असतात, पर्यावरण, तापमान व वाहतूक अशा त्या बाबी आहेत, त्यामुळे काळ्या यादीत टाकत नाही, फक्त अन्न व औषध प्रशासन विभागाला कळविले जाते ते त्याप्रमाणे कारवाई करतात.

अहवालामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, संप्रेरकाची टक्केवारी ५२ टक्के आली असून ते अमानवीय असल्याचे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. त्यामध्ये अतिरिक्त वाईट बाबी काहीही नाहीत. तसेच कपंनीला काळ्या यादीत टाकून फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहिजे होता असा समितीने प्रश्न केला असता भेसळ झाली असती तर १०० टक्के असे झाले असते असे अतिरिक्त अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान) यांनी समितीस विशद केले.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, सदरहू विषय अत्यंत गंभीर असतांना शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबत कारवाई होण्यासाठी एक वर्ष लागले आहे, सदरहू कारवाई त्याच कालावधीत होणे अपेक्षित होती. त्यासंदर्भात संचालक, आरोग्य सेवा यांनी, लायसन्सिंग ऑथोरिटीला लायसन्स रद्द करण्याचे अधिकार असतात. तो औषध निर्मिता कारखाना गुजरातमध्ये आहे, त्यामुळे आयुक्त, गुजरात यांचे अधिकार आहेत. असे प्रकरण असेल तर आपण संबंधित न्यायकक्षे मधील आयुक्तांना पत्र पाठवून कारवाई करण्यात आली आहे असे सांगितले असले तरी सदरहू कारवाई पुरेशी नाही, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, करारामध्ये तरतुदी नमूद केलेल्या आहेत. अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासून घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये कायदा आणि नियम आहेत. संबंधित ॲथोरिटीला कारवाई करण्याचा अधिकार आहे. आपल्या राज्यात नुकसान होऊ नये या कारणास्तव त्या गोळया परत केलेल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ मध्ये मध्यम गंभीर कुपोषित बालकांची (SAM) संख्या २४०५ होती तर तीव्र गंभीर कुपोषित बालकांची (MAM) संख्या ३३५ होती. गंभीर स्वरुपाचे आजार व कुपोषित असलेल्या बालकांची संख्या फार मोठी आहे. गंभीर स्वरुपाच्या आजारामध्ये हृदयाला छिद्र असणे यासह वेगवेगळे पाच ते सहा प्रकारचे आजार असून सिकलसेलचा देखील या आजारामध्ये समावेश आहे. स्तनदा माता व गरोदर स्त्रियांना मानव विकास अभियान अंतर्गत महिन्यातून दोन वेळा मार्गदर्शन शिबीर घेता येते. सन २०११-१२ मध्ये ५९९५ स्तनदा माता होत्या, तथापि, संबंधित अधिकाऱ्यांची मार्गदर्शन शिबीरांना कोणकोणत्या ठिकाणी भेटी दिल्या व सदर शिबीरे कोणकोणत्या ठिकाणी यापूर्वी झाली आहेत याबाबतची व्यवस्थितपणे उत्तरे संबंधित जि. प. अधिकाऱ्यांना देता आली नाहीत. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

मानव विकास अभियानांतर्गत एका मातेला ४००० रुपये एवढी मदत करण्यात येते त्यामुळे प्रत्येक तालुक्यात एकदातरी जाऊन मार्गदर्शन व तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच धुळे जिल्ह्यामध्ये १४ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत अतिजोखमीच्या महिलांना ४०० रुपये एवढे प्रतिमहा आर्थिक सहाय्यव ४०० रुपयांची औषध देण्यात येतात. त्यानुसार जिल्ह्यामध्ये किती महिलांना आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे याची माहिती समितीला पाठविण्यात यावी.

१० ते १२ वर्षापूर्वी साक्री येथे एका आदिवासी पाड्यात जागेची शहानिशा न करता प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधण्यात आली आहे. सदर आरोग्य केंद्र सरकारी पैशात बांधलेले आहे. सदर जागा खाजगी व्यक्तीच्या मालकीची असल्यामुळे जागेच्या मालकाला जागेची किंमत म्हणून ८.८० लक्ष देण्याची तयारी दर्शवून देखील व्यक्ती  जिल्हा परिषदेला जागी देत नाही. त्यामुळे डोंगराळ भागातील दुर्बल आदिवासी माता भगिनींना आरोग्य सेवा तातडीने पुरविणे शक्य व्हावे या दृष्टीने प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधण्यापूर्वी जागेबाबत कोणतीही शहानिशा न करता व तांत्रिक बाबी न तपासता तत्कालिन कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम), मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबधित अधिकाऱ्यांनी याबाबत अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्‍चित करण्यात यावी व संबंधितांविरुध्द कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

**आदिवासी दुर्गम भागामध्ये सिकलसेल हा आजार नसला तरी सिकलसेलमुळे गुडघा व कंबरेची हाडे ढिसूळ झाल्यामुळे प्रकृतीवर परिणाम होतो. परिणामी त्यासाठी रुपये ३ ते ५ लाख खर्च होतो. याकरिता ज्या प्रमाणे हृदयरोग व मुत्रपिंड रोखण्यासाठी शासनाकडून मोफत उपचार दिला जातो. त्याच धर्तीवर सिकलसेल या आजाराचा सुध्दा गंभीर आजारामध्ये समावेश करून त्या रुग्णांना मोफत उपचार पध्दती उपलब्ध करून द्यावी अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

धुळे जिल्ह्यात एकूण ४१ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २३२ उपकेंद्रे आहेत. त्यापैकी आदिवासी क्षेत्रात १४ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी नवसंजीवनी योजना व मानवविकास योजना मानवविकास कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ पर्यंत आदिवासी भागातील किती गरोदर मातांना आर्थिक सहाय्य व औषधाचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच धुळे जिल्ह्यात ० ते १ वर्षाच्या वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी आणि ३ व ४ ग्रेडच्या कुपोषित बालकांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करून आरोग्य तपासणी व औषधोपचार व संदर्भ सेवा देण्यात आली आहे काय आणि आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी व बालमृत्य रोखण्यासाठी इंद्रधनुष्य कार्यक्रम व राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ पर्यंत किती मुलांची तपासणी व लसीकरण करून यशस्वीरित्या उपचार करण्यात आले याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्रात निकृष्ट औषध पुरवठा करण्यात आला, याप्रकरणी विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीला असे आढळून आले की, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे स्तरावरुन Tab Mesoprostol200mg च्या खरेदीसाठी ई-निविदा काढण्यात आली. खरेदी समितीच्या मान्यतेनंतर सर्व आरोग्य संस्थांनी पुरवठा आदेश संचालनालयाच्या दिनांक २३ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्यानंतर औषधाचे नमुने योग्य असणारा अहवाल NABL संस्थेकडून प्राप्त होऊनही अन्न व औषध प्रशासन वर्धा विभागामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा येथून Tab Mesoprostol200mg चा बॅच क्रमांक T-१५००००१ हा नमुना तपासणी अंती अयोग्य/अप्रमाणित असल्याचे दिनांक ११ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. या गोळ्यांसंदर्भात जिल्हा आरोग्य

अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांच्या तपशिलानुसार जिल्हा परिषद धुळे यांना २०१२९ एवढ्या गोळया प्राप्त झाल्या त्यापैकी १८००९ गोळ्या पुरवठादार कंपनीला परत करण्यात आल्या. तेवढ्या गोळया पुन्हा पुरवठादार कंपीनीने जिल्हा परिषद, धुळे यांना केला. २०१२९ गोळ्यांपैकी २१२० गोळयांचे वाटप रुग्णांना झालेले होते. त्या गोळ्यांमुळे रुग्णांना त्रास झाल्याची कोणतीही तक्रार जिल्हा परिषदेला प्राप्त झालेली नाही असे लेखी महितीमध्ये नमूद असले तरी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांसमवेत झालेल्या साक्षीदरम्यान असे आढळून आले की, Tab Mesoprostol 200mg या गोळ्यांच्या विशिष्ट क्रमांकाच्या बॅचमधील नमुना औषध प्रशासन वर्धा विभागाने तपासणी केली असता सदर गोळ्या अयोग्य/अप्रमाणित असल्याचे आढळून आले. तत्पूर्वी २१२० गोळयांचा वापर रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात आली होता. संप्रेरक संयुगाची हि गोळी २०० ग्रॅम वजनाची असून या गोळ्याची निर्मिती गुजरात येथील सेंच्युरिअन कंपनीमध्ये झाली होती ही गोळी प्रामुख्याने बाळंतपणानंतर होणारा रक्तस्त्राव थांबविण्यासाठी पोटाचा अल्सर ठिक करण्यासाठी औषध देण्यात येते. त्यामुळे सदर औषध साधे नसून संवेदनशिल व महत्वाचे आहे.

**समितीच्या मते सदरहू औषधांचा मुद्दा जनतेच्या आरोग्याशी व जीवनाशी संबंधित असून या प्रकरणी औषधाचा दुष्परिणाम झाला असता तर खुप वाईट घडले असते व होणा-या दुष्परिणामामुळे लोकांचे जीवन धोक्यात आले असते. त्यामुळे संबंधित औषधपुरवठा करणा-या कंपनीचा एक दिवसासाठी परवाना निलंबित करण्याचा मुद्दा नसून कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. तरी सदर बाब गुजरात न्यायालयाच्या न्याय कक्षेमध्ये व अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अखत्यारितील असली तरी सार्वजनिक आरोग्य विभाग व अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तरित्या संबंधित पुरवठादार औषध कंपनीवर कारवाई करण्याच्या दृष्टीने पुरवठादार कंपनी समवेत केलेल्या करारामधील तरतुदी व अटी तपासून संबंधित प्राधिकरणाला कारवाई करण्याचे सुचित करावे, तसेच ज्यावेळी समितीने बेटावद प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली होती. त्यावेळी तिथे निकृष्ट दर्जाची व बोगस औषधे आढळून आली होती. याप्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात येऊन संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## परिशिष्ट (अ)

### शासनाचे आदेश व परिपत्रके

**(परिशिष्ट क्र. १.१)**

सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ वैद्यकिय अधिकारी (वेतन श्रेणी रु१५६००-३९१००+ ग्रेड पे रुपये ५४००) ची रिक्त पदे मुलाखतीद्वारे भरण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### शासन परिपत्रक, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र. ७३९/निमं/सेवा ३

१०वा मजला, गो.ते.रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ०१
दिनांक : २४ जून,२०१६.

वाचा - १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ १००७/प्र.क्र.३०७/सेवा-३, दिनांक १०.६.२००९.

२) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२/निवडमंडळ, दिनांक २६.२.२०१६.

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००, ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट - अ दर्जाची पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग कक्षेतून वगळून ती स्वतंत्र निवडमंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन अनुक्रमांक-२ येथील शासन परिपत्रकान्वये सद्यस्थितीत औरंगाबाद व अमरावती विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ आणि नागपूर विभागातील वर्धा अश्या १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली पदे मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक-

१. उपरोक्त १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००, ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून सदर प्रक्रिया राबविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

२. जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ | - | सचिव |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग | - | सदस्य |

३. शासनातर्फे वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावरील निवड प्रक्रियेपुर्वी त्या-त्या वेळी जी रिक्त पदे असतील त्यांची प्रवर्गनिहाय (खुला, अज, अजा, इमाव, विमाप्र, भज-अ, भज-ब, भज-क, भज-ड इत्यादी भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करुन तसेच समांतर आरक्षणासाठी पदसंख्या निश्चित करुन संपूर्ण राज्यात प्रवर्गनिहाय भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करण्यात येईल व तद्नंतर पद भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

४. समुपदेशनासाठी आरोग्य संस्थांमधील विशेषज्ञांची रिक्त पदे, एकही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नसलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि एक वैद्यकिय अधिकारी उपलब्ध आहे अशा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी समुपदेश घेण्यात यावे.

५. समितीने जाहिरातीनुसार प्रवर्गनिहाय आणि आरक्षणानुसार रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन समितीने उमेदवारांची शैक्षणिक अर्हता (एमबीबीएस/ विशेषज्ञत्व), अनुभव, वय, प्रवर्ग इत्यादी बाबींची तपासणी करुन त्याआधारे पुढील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या निकषानुसार उमेदवारांचे गुणांकन करावे.

| अ.क्र. | तपशिल | एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण (weightage) | पदव्युत्तर पदवी/ पदविका शैक्षणिक अर्हताधारकंसाठी गुणांचे प्रमाण (weightage) |
|---|---|---|---|
| १ | पदवी परीक्षेच्या सर्व वर्षांमध्ये मिळालेले सरासरी गुण | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) | लागू नाही. |
| २ | पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागू नाही. | ६०% (जास्तीत जास्त ६० गुण) |
| ३ | शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाही ला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| ४ | शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकूण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| | **एकूण गुण** | **१००** | **१००** |

७. गुणांकनानुसार विहीत कार्यपध्दतीद्वारे पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी व निवड मंडळ कक्षास सादर करावी.

८. समितीने सादर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार उमेदवारास आरोग्य संस्थेमध्ये रिक्त पदाच्या ठिकाणी पसंतीनुसार नियुक्ती मिळण्याकरीता समुपदेशन घेण्यात यावे.

९. समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीकरीता दर्शविलेली पसंती याची तपासणी करुन उमेदवारास रिक्त पदावर नियुक्तीचे आदेश शासनामार्फत काढण्यात यावेत.

१०. नियुक्ती आदेशानंतर लगेचच सेवार्थ प्रणालीमध्ये संबंधित वैद्यकिय अधिकारी यांची नोंद होईल व वेतन सुरु होईल याची दक्षता घेण्यात यावी.

११. नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील व वेतन हे

बायोमेट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

१२. एकूण रिक्त पदांच्या ७५% एवढया मर्यादेत पदे भरण्यास मुभा राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०६१७१८३४५९१९१७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Rambhaji Dahiphale

Digitally signed by Vivek Rambhaji Dahiphale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, cn=Vivek Rambhaji Dahiphale
Date: 2016.06.24 17:10:54 +05'30'

( वि.र.दहिफळे )
**निवडमंडळाचे सदस्य सचिव तथा सह सचिव**
**महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री ( सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहायक.
५. संचालक, आरोग्य सेवा , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
८. सर्व जिल्हाशल्य चिकित्सक.
९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
१०. निवड नस्ती ( निवडमंडळ ).
११. निवडनस्ती (सेवा ३)

**(परिशिष्ट क्र. १.२)**

**सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ वैद्यकिय अधिकारी (वेतन श्रेणी रु१५६००-३९१००+ ग्रेड पे रुपये ५४००) ची रिक्त पदे मुलाखतीद्वारे भरण्याकरिता मार्गदर्शक सूचना.**

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### शासन परिपत्रक, क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र. ७३९/सेवा ३

१०वा मजला, गो.ते.रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ०१
दिनांक : २६ ऑक्टोबर,२०१६.

**वाचा -** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः मवैअ १००७/प्र.क्र.३०७/सेवा-३, दिनांक १०.६.२००९.

२) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२/निवडमंडळ, दिनांक २६.२.२०१६.

३) शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२/निवडमंडळ, दिनांक २४.६.२०१६.

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००, ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk in interview) भरण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून सदर प्रक्रिया राबविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. ३ येथील शासन परिपत्रकान्वये निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सदर दि.२४.०६.२०१६ च्या परिपत्रकामधील परिच्छेद क्र.२ व परिच्छेद क्र.३ मध्ये काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक-**

संदर्भाधीन ३ येथे नमुद दि.२४.०६.२०१६ च्या परिपत्रकांन्वये वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ | - | सचिव |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग | - | सदस्य |

**आता ,उक्त समिती ऐवजी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **जिल्हाधिकारी** | - | **अध्यक्ष** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद** | - | **सदस्य** |
| **जिल्हा समाज कल्याण अधिकारी** | - | **सदस्य** |
| **जिल्हा शल्य चिकित्सक** | - | **सदस्य** |
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | - | **सदस्य सचिव** |
| **सहायक आयुक्त, आदिवासी विकास विभाग** | - | **सदस्य** |

२. तसेच संदर्भाधीन ३ येथे नमूद दि.२४.०६.२०१६ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.३ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**"शासनातर्फे वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावरील निवड प्रक्रियेपुर्वी त्या-त्या वेळी जी रिक्त पदे असतील त्यांची प्रवर्गनिहाय (खुला, अज, अजा, इमाव, विमाप्र, भज-अ, भज-ब, भज-क, भज-ड इत्यादी ) भरावयाच्या पदांच्या संख्येचे प्रमाण (टक्केवारी) ,समांतर आरक्षणासाठी पदसंख्या निश्चित करुन संपूर्ण राज्यात प्रवर्गनिहाय भरावयाच्या पदांची संख्या राज्यस्तरावर निश्चित करण्यात येईल. राज्यातील प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या प्रमाणात जिल्ह्यातील रिक्त पदांची प्रवर्गनिहाय टक्केवारी निश्चित करुन तेवढ्याच पदांची जाहिरात प्रत्येक जिल्हाधिकारी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यांसाठी व्यापक प्रमाणात प्रसिध्द करतील. रिक्त पदांच्या आरक्षणाचे प्रमाण शासनस्तरावरून स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.मात्र, नियुक्ती प्रक्रियेच्यावेळी आरक्षणाबाबत प्रवर्गनिहाय पदसंख्या अंतिमतः राज्य स्तरावर निश्चित करण्यात येईल.वरील प्रक्रिया जिल्ह्यातील रिक्त पदे भरे पर्यंत चालू ठेवण्यात येईल."**

४. संदर्भाधीन ३ येथे नमूद दि.२४.०६.२०१६ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र.२ व ३ मधील तरतुदी यापुढे लागू राहणार नाहीत. उर्वरीत सर्व तरतुदी यापुढेही लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६१०१३१८३५१४४०१७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Rambhaji Dahiphale

Digitally signed by Vivek Rambhaji Dahiphale
DN: CN = Vivek Rambhaji Dahiphale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Dept
Date: 2016.10.26 18:30:22 +05'30'

**( वि.र.दहिफळे )**
**निवडमंडळाचे सदस्य सचिव तथा सह सचिव**
**महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री ( सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहायक.
५. संचालक, आरोग्य सेवा , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
८. सर्व जिल्हाशल्य चिकित्सक.
९. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
१०. निवड नस्ती ( निवडमंडळ ).
११. निवडनस्ती (सेवा ३)

**(परिशिष्ट क्र. २.१)**

**जिल्हा परिषद पंचायत समितींच्या व ग्राम पंचायतीच्या स्वउत्पन्नाच्या अर्थसंकल्पात ३% निधी अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता राखून ठेवणेबाबत अपंग कल्याण कृति आराखडा - २००१.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/ वित्त-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २५ जून, २०१४.

वाचा -

१. **शासन निर्णय समक्रमांकः दिनांक १८ ऑक्टोबर, २००७**
२. **शासन निर्णय समक्रमांकः दिनांक ५ ऑक्टोबर, २००७**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र शासनाच्या सन २००१ च्या अस्तित्वात आलेल्या अपंग कल्याण कृति आराखडयामध्ये रोजगार व स्वयंरोजगार विषयक उपाययोजना या सदराखालील अनुक्रमांक ६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय योजना, केंद्र शासनाच्या योजना, दारिद्र निर्मुलन योजना या अंतर्गत किमान ३% लाभार्थी अपंग असावेत असे सूचीत करण्यात आले आहे. तसेच अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या एकूण निधीपैकी ३% निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता राखून ठेवावा असे ही निर्देश दिले आहेत.

या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र ११८/२०१० व याच विषयावरील अन्य जनहित याचिका / रिट याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि. १८/३/२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या प्रत्येक विभागाने अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता अर्थसंकल्पीय तरतूद अपंग कल्याण कृति आराखडयानुसार करावयाची आहे.

राज्यातील जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वनिधीमधून ३% निधी अपंगांच्या कल्याणाबाबत राखून ठेवण्याबाबत व अपंग लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००७/ प्र.क्र.४८७१/ वित्त-३ यापूर्वीच दि.५/१०/२०१२ रोजी निर्गमित केलेला आहे.

राज्यातील पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायती यांनी सुध्दा जिल्हा परिषदेप्रमाणे त्यांच्या स्वनिधीमधून अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता ३% निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले नव्हते. तथापी अपंग कल्याण कृति आराखडा व मा.उच्च न्यायालयाच्या दि.१८/०३/२०११ च्या निर्णयानुसार अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता ३% अर्थसंकल्पीय तरतूद

करणे व वैयक्तिक लाभांच्या योजनेत अपंग लाभार्थी असावेत असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी म्हणजे राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायती यांनीदेखिल त्यांच्या स्वनिधीमधून अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता ३% तरतूद करणे आवश्यक आहे. या अनूषंगाने सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायती एकत्रीत सूचना देण्यासाठी सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्याप्रमाणे आता संदर्भ क्र.१ व २ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमीत करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी त्यांच्या स्वनिधीच्या एकुण उत्पन्ना पैकी ३% निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता राखून ठेवावा व तो त्याच कारणासाठी वापरावा. जिल्हा परिषदेने त्यांचा सदरचा निधी, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सुपूर्द करावा.

जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्वनिधीमधून वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना त्यात एकूण लाभार्थ्यांपैकी ३% लाभार्थी हे अपंग प्रवर्गातील असावेत.

सदरची तरतूद सन २०११-१२ पासून करावयाची आहे. तशी तरतूद केली नसल्यास सन २०११-१२ पासून च्या अनुशेषासह इथून पूढे ही तरतूद स्वनिधीच्या अर्थसंकल्पात सर्व जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी करावी.

सदरचा निधी कटाक्षाने अपंगांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता संपूर्णपणे खर्च होईल याबाबतची उपाययोजना प्राथम्याने करण्यांत यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. **२०१४०६२५१२५०२०१३२०** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan Shankarraw Kamble

Digitally signed by Priyadarshan Shankarraw Kamble
DN: CN = Priyadarshan Shankarraw Kamble, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Date: 2014.06.25 16:07:31 +05'30'

**(प्रि.शं.कांबळे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.सचिव ( सर्व मंत्रालयीन विभाग)

२) मा. लोकआयुक्त कार्यालय, नवीन प्रशासन भवन, १ ला मजला, मादाम कोमा मार्ग, मुंबई-३२

३) सर्व विभागीय आयुक्त,

४) सहाय्यक आयुक्त विकास (सर्व)

५) महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखा परिक्षा) मुंबई. (५ जादा प्रतीसह)

६) महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखा परिक्षा) नागपूर. (५ जादा प्रतीसह)

७) महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई. (५ जादा प्रतीसह)

८) महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर (५ जादा प्रतीसह)

९) जिल्हाधिकारी, सर्व.

१०) अध्यक्ष, जिल्हा परिषद सर्व,

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)

१२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व) (मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. यांच्या मार्फत)

१३) ग्राम सेवक, ग्रामपंचायत (सर्व), (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांच्या मार्फत)

**(परिशिष्ट क्र. ८.१)**

**घरभाडे भत्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः घभाभ-१०१५/प्र.क्र.१/सेवा-५**
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०७ ऑक्टोबर, २०१६.

वाचा

१) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.सीपीए-१४८४/सीआर-१२७५/एसईआर-५, दिनांक २०.९.१९८४.
२) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेपूर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५.४.१९८८.
३) शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.घभाभ-१०९०/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ५.२.१९९०.

प्रस्तावना -

ग्रामीण भागात कामाच्या मुख्यालयी वास्तव्य करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनाच शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २०.९.१९८४ अन्वये घरभाडे भत्ता अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. तथापि शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २५.४.१९८८ मधील परिच्छेद क्र.४ अन्वये, घरभाडे भत्याच्या पात्रतेसाठी ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात विहित केलेली शर्त, ही तरतूद काढून टाकण्यात आली तसेच शासन निर्णय क्र:घभाभ-१०९०/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ०५.०२.१९९० मध्येही सुद्धा सदर अट काढून टाकण्यात आली.

वरीलप्रमाणे ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांसाठी घरभाडे भत्याच्या प्रयोजनासाठीची कामाच्या ठिकाणी राहण्यासंदर्भातील अट काढून टाकली असली तरी, पंचायत राज समितीने सन २००८ मध्ये दिलेल्या निर्देशास अनुसरून, ग्रामविकास व जलसंधारण विभागाने, त्यांच्या अधिनस्त, जिल्हा परिषदेअंतर्गत गट-क व गट-ड मधील जे कर्मचारी त्यांच्या मुख्यालयी राहत नसतील त्यांचा घरभाडे भत्ता व वेतनवाढ रोखण्यात यावी व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी अशा आशयाची परिपत्रके दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ रोजी निर्गमित केली. तथापि महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, जळगांव या प्राथमिक शिक्षकाच्या संघटनेने, ग्रामविकास विभागाच्या उपरोक्त दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ च्या परिपत्रकास व दिनांक १४.३.२०१४ च्या पत्रास मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.५८२२/२०१४ दाखल करुन आव्हान दिले. या याचिकेमध्ये दिनांक १९.१०.२०१५ रोजी झालेल्या अंतिम सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने निष्कर्ष काढला आहे की, उपरोक्त परिच्छेदामधील शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ५.२.१९९०, परि.क्र.४ मधील तरतूद ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ५.७.२००८ व दिनांक ३.११.२००८ च्या परिपत्रकामुळे अधिक्रमित होत नाही त्यामुळे याचिकाकर्ता संघटनेच्या सदस्यांना दिनांक ५.२.१९९० मधील परि.क्र.४ मधील तरतूदीनुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय असून सदर घरभाडे भत्ता रोखून ठेवला असल्यास तात्काळ अदा करावा असे देखील मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दिनांक १९.१०.२०१५ च्या आदेशाचा परामर्श घेवून पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

शासन निर्णय क्रमांक:वेपूर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५.४.१९८८ मधील व शासन निर्णय क्रमांक:घभाभ-१०८९/प्र.क्र.१०/सेवा-५, दिनांक ५.२.१९९० मधील "ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या

बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात, घरभाडेभत्त्याच्या पात्रतेसाठी विहीत केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे" ही तरतूद वगळण्यात येत आहे.

हे आदेश दि.०१.११.२०१६ पासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१००७१५४६४१७९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Devidasrao Londhe

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9d297f5b1e7f2bf7e6f49cd44c8fa4445bb6dd845973cab6e8165c47a8f46a4, serialNumber=b973cbc71c4136d97edeae58395e03da221147d1afdd343ba4d7a2492e6a54b6, cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2016.10.07 15:47:59 +05'30'

**(श्री.दे.लोंढे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
७. सचिव, मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
११. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१३. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
१६. आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. सर्व जिल्हाधिकारी,
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
२२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२६. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
२७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२९. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
३०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३३. लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे/ औरंगाबाद
३४. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
३५. *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३७. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
३८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
३९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
४१. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
४२. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
४३. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
४४. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
४५. निवड नस्ती, कार्यासन सेवा-५.

*पत्राद्वारे.

## परिशिष्ट (ब)

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## बुधवार, दिनांक ५ जुलै, २०१७
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, धुळे

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री.अनिल गोटे, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(६) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

(७) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(१०) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(११) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१२) श्री. राजाभाऊ (पराग) वाजे, वि.स.स.

(१३) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

(१४) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१५) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(१६) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

(१७) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :**

श्री. काशीराम पावरा, वि.स.स.

श्री. डी. एस. अहिरे, वि.स.स.

**स्थानिक पदाधिकारी :**

(१) श्री. शिवाजीराव दहिते, अध्यक्ष, जिल्हा परिषद, धुळे

(२) श्री. मधुकर गरदे, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, धुळे

(३) श्रीमती सुनंदा गिरासे, सभापती, पंचायत समिती, शिंदखेडा

(४) श्रीमती अनिता पाटील, सभापती, पशुधन समिती, जिल्हा परिषद, धुळे

(५) श्रीमती वंदना गुजर, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, धुळे

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. व्ही. डी. शिंदे, उप सचिव

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी

एचबी १६०९[illegible]१अ

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

डॉ. वर्षा फडोळ, सहाय्यक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, धुळे**

(१) श्री. गंगाथरन डी, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) डॉ. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. अरविंद मोरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
(४) श्री. तुषार माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(५) श्री. प्रविण देवरे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(६) श्री. तुषार माळी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(७) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(८) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(९) श्री. मोहन देसले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१०) श्री. मोहन देसले, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(११) श्री. वाय. एस. बि□हाडे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(१२) श्री. एल.एम.शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
(१३) डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) श्री. एस. बी. पड्यार, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)
(१५) श्री. बी. व्ही. बैसाणे, कृषी विकास अधिकारी
(१६) श्री. वाय. बी. साळुंखे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१७) कुमारी हर्षदा बडगुजर, प्रभारी समाजकल्याण अधिकारी
(१८) श्री. जी. डी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे
(१९) श्री. एस. जी. शिवदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा
(२०) श्री. सी. आर. भावसार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री
(२१) श्री. एम. डी. बागूल, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरपूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८□२००९ व सन २०११□२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील धुळे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ६ जुलै २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, धुळे**

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. अनिल गोटे, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(७) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

(८) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१०) श्री. राजाभाऊ (पराग) वाजे, वि.स.स.

(११) ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

(१२) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. व्ही. डी. शिंदे, उप सचिव

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

डॉ. वर्षा फडोळ, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, धुळे**

(१) श्री. गंगाथरन डी, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. अरविंद मोरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. तुषार माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. प्रविण देवरे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. तुषार माळी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(७) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(९) श्री. मोहन देसले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. मोहन देसले, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. वाय. एस. बि□हाडे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१२) श्री.एल.एम.शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

(१३) डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) श्री. एस. बी. पड्यार, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. बी. व्ही. बैसाणे, कृषी विकास अधिकारी

(१६) श्री. वाय. बी. साळुंखे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१७) कुमारी हर्षदा बडगुजर, प्रभारी समाजकल्याण अधिकारी

(१८) श्री. जी. डी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे

(१९) श्री. एस. जी. शिवदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा

(२०) श्री. सी. आर. भावसार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री

(२१) श्री. एम. डी. बागूल, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२□२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक□२ संदर्भात धुळे जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ७ जुलै, २०१७**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, धुळे**

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. अनिल गोटे, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(६) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

(७) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(८) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१०) श्री. राजाभाऊ (पराग) वाजे, वि.स.स.

(११) ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

(१२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

(१३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. व्ही. डी. शिंदे, उप सचिव

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

डॉ. वर्षा फडोळ, सहाय्यक आयुक्त (चौकशी)

**जिल्हा परिषद, धुळे**

(१) श्री. गंगाथरन डी, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. अरविंद मोरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. तुषार माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. प्रविण देवरे, प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. तुषार माळी, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(७) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. अनिल सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(९) श्री. मोहन देसले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. मोहन देसले, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. वाय. एस. बि□ाडे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१२) श्री. ए. एम. गोरे, प्रभारी उप कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. एल. एम. शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

(१४) डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी

(१५) श्री. एस. बी. पड्यार, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१६) श्री. बी. व्ही. बैसाणे, कृषी विकास अधिकारी

(१७) श्री. वाय. बी. साळुंखे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१८) कुमारी हर्षदा बडगुजर, प्रभारी समाजकल्याण अधिकारी

(१९) श्री. जी. डी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे

(२०) श्री. एस. जी. शिवदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा

(२१) श्री. सी. आर. भावसार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री

(२२) श्री. एम. डी. बागूल, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरपूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८□०९ व सन २०११□१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२□२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील धुळे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १५ मे, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव (अतिरिक्त कार्यभार), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. एकनाथ डवले, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग

(७) श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(८) श्री. ता. मा. कोळेकर, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(९) श्रीमती स्मिता निवतकर, उप सचिव, महिला व बालविकास विभाग

(१०) श्रीमती व्ही. जी. देशमुख, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग

(११) श्री. पां. रा. खोटरे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(१२) श्रीमती स्वाती नानए, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री.आ.ना.भोंडवे, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१४) श्री.संजीव कांबळे, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

(शा.म.मु.) एचबी १६०९–१० (६००–१–२०१८)

**जिल्हा परिषद, धुळे**

(१) श्री. गंगाथरन डी., मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. ए. एस. मोरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. प्रविण देवरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. जे. एन. आभाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. ए. जे. तडवी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) श्री. एस. बी. पड्यार, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)

(८) श्री. प्रविण अहिरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(९) श्री. एम. एस. देसले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. रा. ही. पाटील, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(११) डॉ. एम. वाय. पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक

(१२) डॉ. बी. जी. चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१३) श्री. एस. एम. शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे)

(१४) श्री.बी.आर.धिवरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव (अतिरिक्त कार्यभार), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, महिला व बालविकास विभाग, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ मे, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(३) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(६) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(८) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय**
श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(२) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग
(३) श्रीमती विनिता वेद सिंघल, सचिव, महिला व बालविकास विभाग
(४) डॉ. पल्लवी दराडे, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग
(५) श्री. नितीन देवरे, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग
(६) डॉ. संजीव कुमार, संचालक, डी.एच.डी.
(७) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग
(८) श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग
(९) श्रीमती व्ही.जी. देशमुख, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग

**जिल्हा परिषद, धुळे**

(१) श्री. गंगाथरन डी., मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अर्जुन गुंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. ए. एस. मोरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. प्रविण देवरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. ए. जे. तडवी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(६) श्री. एम. एस. देसले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. रा. ही. पाटील, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(८) डॉ. बी. जी. चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, अवर सचिव, महिला व बालविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, उप संचालक, ग्रामविकास विभाग, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, संचालक, डी.एच.डी. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत एकोणीसाव्या व एकविसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई